१९४०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६८




REFBK-0011246
REFBK-0011246

सन १९६०

३८८९०

सा.शा.
१६७९

३८८८०
ग्रामवाचन
का. शा.
१६७८

# वानगी

[काव्य-संग्रह]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२४६
संग्रह ... प्रत

संपादक :
गोविंद नन्नोरे
जय इंगळे

प्रस्तावना :
प्रा. मधुकर केचे

स्वागत :
प्रा. रु. पां. पाजणकर

REFBK-0011246
REFBK-0011246

मूल्य :
दोन रुपये

शशी प्रकाशन धामणगांव

मुखपृष्ठ : जय वर्मा, नागपूर
सर्व हक्क प्रकाशिकेचे स्वाधीन
प्रथमावृत्ति : आक्टोंबर १९६०

| | |
|---|---|
| म. ल. वराडपांडे | सौ. कमलाबाई सोहनी |
| उ. रा. गिरी | काव्य भृंग |
| बाबा मोहोड | जय इंगळे |
| शंकर काळे | जे. बी. देशमुख |
| सुधाकर लोखंडे | रंगनाथ वंदसोडे |
| कृष्ण माधव देशमुख | कृष्णा बापू पाटील |
| केशव काळे | वामनाग्रज |
| गोविंद नन्नोरे | महादेव श्रीखंडे |
| विठ्ठल | हरिहर वा. देशमुख |
| द्वारकानंद | काशीनाथ सुत |
| शेषराव पाटील | मनोहर सिरास |
| केशव बोवडे | पांडरंग बोंदरे |
| ना. गो. खडसे | उ. आ. झटाले |
| ना. रा. पांडे | ल. गो. गोहने |
| विष्णुपंत तानवडे | राम पुसदकर |
| चि. गो. कुळकर्णी | पद्माकर जोशी |
| श्रीकांत गोवंडे | वसंत देशमुख |
| जीवनकुमार स्व. राठी | सौ. निला देशपांडे |
| गु. सू. मेहरे | हरीश मानधना |
| वसंत खोंडे | कुसुम |

प्रकाशिका : सौ. आशा नन्नोरे, शशी प्रकाशन, वार्ड नं. १, धामनगांव (विदर्भ)
मुद्रक : श्री. मोहनलाल भट्ट, राष्ट्रभाषा प्रेस, हिन्दीनगर, वर्धा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 36660 वि: 3104
क्रमांक 16460 नों दि: 15-9-

***

'खरं काव्यं हृदयाची पारख करून ती जोडण्यांत आहें',
या बाबतींत माननीय आमदार

**रा. जा. उर्फ बाबासाहेब घारफळकर**

(अध्यक्ष : विदर्भ काँग्रेस व नगरपालिका, यवतमाळ)
यांचें कार्यकौशल्य व लोकसंग्राहक वृत्तीचा
आम्हांस जो साक्षात्कार झाला
त्याबद्दल
ही अल्पकृति
त्यांना

**सादर समर्पित**

***

# प्रस्तावना

वानगी हा शब्द बहुजन समाजातून आलेला आहे. व्युत्पत्ति लावण्याचा खरे म्हणजे खटाटोप करू नये. मला व्यक्तिशः त्यातल्या व्युत्पत्ति पेक्षाहि मनावर अज्ञात कारणांनी उठणाऱ्या गोड लहरीच तेवढ्या अशा शब्दांना ऐकल्यावर जाणवतात. 'वानगी' मधल्या 'वान' या शब्दाचे मनातल्या मनात 'वर्ण' या शब्दाशी नाते जुळते. आणि एक 'वेगळी रंगत' म्हणजे वानगी असा काहीसा अर्थ जुळून जातो. हे नांव काव्य-संग्रहाला देण्यांत संपादकानी दाखविलेले औचित्य उमगल्यामुळेच असेल कदाचित; वानगी ही नव्या, कवींची वेगळी देणगी अशी ओळ मनांत स्फुरु लागली.

वानगी ही सर्रास नसते. तिचे गुणदोष काढू नये. नवे लोक त्यामुळे दुखावतात. दोष काढणारा अप्रिय होतो. गुण दाखविणाराहि कधी-कधी चर्चेस पात्र ठरतो. हे सारे धोके पत्करूनहि या वानगीचे गुणदोष मी वानगी दाखलच काढण्याचे योजीत आहे.

वानगीतले कवि हे एकाच तऱ्हेचे नाहीत ही त्यातली पहिली वानगी आहे. मर्ढेकरांपूर्वीचे लोकप्रिय कविहि वानगीकारांच्या परिचयाचे दिसतात. शिवाय आजचेहि नवकाव्याच्या वेगळे राहणारे काव्य वानगीतल्या कवींना रुचलेले दिसते. मासिकांवर पडलेली नवकाव्याची छाया वानगीतून बऱ्याच प्रमाणात टळलेली आहे. रक्त मास हाडे या मंडळींनी येथे धुमाकूळ घातलेला दिसत नाही. आजच्या मासिकी कवितेतून पुन्ह-पुन्हा आवर्तित होणारे शब्द वानगीत थोडे फार दिसतातहि, कधीमधी एखादा कवि नवकाव्याने झपाटलेला आढळतोहि; पण प्रत्येकाचा पिंडच त्या गोष्टींना इतका प्रतिकुल आहे की धरतो म्हटले तरी तसल्या गोष्टींची कास या मंडळीस धरता येत नाही. या असमर्थतेतूनच वानगीचे वानगीपण उदयास येते.

ओघ नवकाव्यावरच वळला म्हणून आज नवकवि ठरु पाहणारे कांही कवि पडताळून पाहवे लागतील. श्री म. ल. वऱ्हाडपांडे, श्री हरीश मानधना, श्री उ. रा. गिरी, श्री बाबा मोहोड हे लोक त्यांची इच्छा असो अगर नसो पण नवकवींच्या काळांत रसिकांच्या समोर आहेत म्हणून त्यांना नवकवि म्हणणे

भाग आहे. फार तर ते रक्त, मास, हाडे, मैथुन इ. च्या वाटेला गेलेले दिसत नाहीत म्हणून त्यांना मर्ढेकरी नवकाव्यात बसवू नये. पण पाडगावकरादींचा काळ त्यांना रुचला आणि पचला असे ठळकपणे दिसत असल्यामुळें निदान 'मर्ढेकरोत्तर नवकवि' ही संज्ञा त्यांना द्यायला अडथळा नसावा.

वरील मंडळीत रचनेची सफाई व शब्द वापरण्याचे कौशल्य हे नव-काव्याचे गुण आलेले आढळतात. पण कुठे-कुठे ते नव्यातल्या कांहीं स्थळांना नको तेथे बळी पडतात असाहि संशय येतो. हेच उदाहरणादाखल दाखवायचे तर प्रथम श्री बाबा मोहोड यांचा अभंग घेऊ.

श्री मोहोड आज बहुतेकांना परिचित आहेत. 'आज पहाटेला' ही स्वप्नरंजन खुलविणारी त्यांची कविता मला व्यक्तिशः आवडलेली आहे. विरहाला शमविणारे स्वप्न मीलन हा त्या कवितेचा विषय अत्यंत समर्पक शब्दानी मांडलेला आहे. पण अभंगाचे वृत्त घेऊन त्यांनी बराच घोटाळा केला. संत तुकारामाने प्रेमाच्या लघुकथा लिहिल्या सारखे वाटून गेले. अभंग हा आजतरी आपले आंगचे पावित्र्य घेऊन चिपळचा वाजवीत रसिकांना ईशप्रेमाचा सुगंधी बुक्का लावीत यायला हवा. अभंगाला एक भला मोठा फेटा आहे. त्याच्यातले घटक वारकऱ्याच्या शिस्तीने व श्रद्धेने विठोबाला हाक मारतात. पण हा वारकरी सज्जन जर स्वप्नांतल्या प्रेमिकेशी बोलू लागला तर. . . . . . . . .

अर्थातच श्री मोहोडांपासूनची ही अपेक्षा त्यांच्या योग्यतेमुळेंच मला करावी लागली. अभंग हे वृत्त च नव्हे तर वृत्ति देखील आहे हे मोहोड यांना कळावे ही अपेक्षा होती. कारण 'आज जाहला उशिर जरासा' ही त्यांची कविता मला आवडते. त्यांनी ईश्वर व रमणी या दोहोवरहि सारख्याच सामर्थ्याने लिहावे असे मी मित्राप्रमाणे सुचवीन. अमक्याला तमकेच वृत्त हवे असा आग्रहहि कदाचित धरणार नाही. पण अभंगासारख्या ज्या कांही निवडक वृत्तांना 'वृत्ति' आल्या आहेत त्याबाबत त्यांच्या सारख्या जागरुक कवीने अधिक सावध असावे इतकेच.

अभंगामुळेंच श्री हरीश मानधना यांचाहि उल्लेख अटळ आहे. तुक्याचे अभंग इंद्रायणीने तारले म्हणून तिच्या कीर्तीची धार अखंड राहील हा भाव अभंगाशी जुळणारा असाच आहे.

आणखी एक कवि श्री. वऱ्हाडपांडे त्यांची कविता नावाची कविता. एकच एक आग्रह व विचार प्रवाह त्यांच्या तिन्ही कडव्यांतून झाल्याने नवे कांहीं सांगितले न जाता अर्थविस्तार तेवढा झाला. पण शेवटच्या कडव्यांत रविचंद्राच्या तेजाला दीप ठरवून अमेच्या काळोखाला पुरणारे 'नवतेज' मन वेधून घेते. शब्दांची समर्पकता तेथे पटते.

श्री. उ. रा. गिरींच्या कवितेंत कवींना एक इशारा दिला गेलेला आहे. शब्दावर पिसारा फुलवावा, पण तो आशयाचा आणि कविता ही त्या आशयाला 'नाच' म्हणणारी एक लांडोर आहे. हा तो उत्कट इशारा. स्वतः गिरींचे मी अनुभववेलेलें बरेंचसे काव्य त्या तृप्त मानवकाशातले आहे.

यानंतर नवकाव्यापेक्षा वेगळे, बव्हंशी जुन्या अथवा आजच्या सत्यकथे-वर कवींशी निगड असलेले कितीतरी कवि वानगीचे मानकरी आहेत. त्यांनी निवडलेलें काव्यविषय देखील जुने अथवा सत्यकथेच्या बाहेरचे आहेत.

उदा. द्वारकानंद कवीची रंजल्यागांजल्या जीवासाठी फुलणारी प्राण ज्योती ही साधी पण मनोहर कविता पहा. नवकाव्याशी न जुळणारी पण अभंगाशी नाते जोडणारी ही वृत्ति किंवा श्री. शंकर काळे यांची फुलाकाट्यांतून सतत पुढे जाणारी गति या दोन्ही कौतुकास्पद आहेत. (केशव काळे) शोध हा अभंग कधी कधी तुकारामाचा नसला तरी मीरेच्या ओठातला वाटतो. 'पलक लगी पलमे पिव आये' हा स्वप्नाभास 'स्वप्नाच्या डोहात लागता चाहूल' होऊन येतो. अनुकरणाचा येथे प्रश्न नाहीं. स्फूर्तीची छाया तेवढी आढळावी. तसेंच द्वारकानंदांच्या 'निर्धार' या अंभंगांतूनहि संत तुकडोजींच्या 'पुजारी क्यो दरवाजा अडा' या समकालीन ओळींची आठवण होते.

नवोदितांवर छाप पडली तर ती फक्त सत्यकथेच्या कवींचीच असा खाक्या येथे दिसत नाहीं. मीरा, तुकडोजी आदि संतहि कविता लिहितात. हे निदान वानगीवाल्यांनी ओळखलेले दिसते. झटपट प्रसिद्धीच्या मागे लागलेल्या इतर नवोदितांना मात्र केवळ १९५० नंतरच्या प्रयोगवादी कवींनी ग्रासलेले आढळते याचा रसिकांना प्रत्यय आहेच.

वरील मंडळीवर नव्या बहराची छाप पडलीच नाही असें नाही. पण त्याच वेळी त्यांनी आततायीपणा न करता इतरहि काव्य प्रकारांना मानलेले स्पष्ट दिसते.

जुनी कविता एकदम लोपून मर्ढेकरांची कविता वादळासारखी का आली त्याचे एक प्रमुख कारण हे आहे की जुन्या कवितेत पाल्हाळ होता. नव्या कवितेतून तो गेला, पण फक्त मर्ढेकरांच्या. त्यांची कडवट व अतिस्पष्ट अथवा नग्न अभिव्यक्ति रसिकवराला न मानल्याने शेवटी श्री. पाडगावकर, बापट इ. छुपे गीतकवि पुढे आले. त्यांच्या ठाकठिकीच्या शब्दरचनेमुळे व मृदु मुलायम आणि चमकदार भावनांमुळें अनेक दिवसपर्यंत त्यांच्यातला छुपा पाल्हाळ लोकांच्या नजरेस आला नाही. पण वानगीतले तशा रचनेला मोहलेले त्यांचे कांही भक्त बघितले म्हणजे त्या चेल्यांच्या सद्‌गुरुंच्या कविताहि आज नव्या डोळयाने वाचण्याची गरज भासू लागते—अमके व्हावे, तमके व्हावे, मला वाटते, मनात येते, मला वाटत नाही मनांत येत नाहीं इ. वळणाच्या काहीं रचना ५३–५४ च्या सुमारास बोकाळल्या होत्या. त्याचे वानगीतले ठसे पाहा—

श्री वराडपांडे यांची 'कविता' तिच्याबद्दल याच संदर्भाने मागे येऊन गेले. श्री जे. बी. देशमुख यांची 'मला न वाटे' पहा. तिच्यातले वाटण्याचे व न वाटण्याचे आधिक्य, श्री वसंत खोंडे यांचे 'मला वाटते,' मधली वाटण्याची वाढ, पुन्हा श्री जे. बी. देशमुखांच्या मनांत येते शतदा ऐसे' मधल्या लहरी, हे सर्व निदान रचनेच्या एका विशिष्ट धर्तीला मोहून आपला आनुशाईक पाल्हाळ दर्शवितात.

वरील कवि या कारणांनी खरे तर काळाच्या ओघात गडप व्हावयाचे. पण ते व इतरहि वानगीवाले काव्यप्रांतावर निराळ्या कारणांनी अधिकार सांगू शकतात. आजच्या कवींना वानगी दाखल ते मोहलेले आहेत हे खरे असले तरी मासिकी कवींच्या मर्यादित जीवन रेखेच्या ते पार गेले आहेत म्हणूनच ते अंधारांत कां होईना पण जगले. उद्या ते उजेडांत जगतील. त्यांची प्रतिमा, उपमा, निवडण्याची आवड ही संस्कृतातल्या 'स्वात्ती 'स्वधर्मे निधबं श्रेय' इत्यादि पासून तो अुर्दू कवितेत हमेशा जलवा दिखानेवाल्या पतंग व दिपज्योति (याने शमापरवाना) पर्यंत आहे. पण त्या प्रतिमांमधून त्यांचे जे विषय विरहतात ते समाजोन्मुख आहेत. त्यात प्रेम, वात्सल्य, राष्ट्रभक्ति सर्वच आहे. निसर्ग दर्शनहि आहे.

श्री जे. बी. देशमुख यांची ‘ लाखेचा मणी ’ ही चमत्कृति, श्री विठ्ठल कवीची व्यवहाराचे टोले खाणारी आशा,श्री सुधाकर लोखंडे यांचे विशालावर तरंगणारे मीलन-चित्र, श्री जे. बी. देशमुखांची ध्येयवेगी नदी, श्री केशव बोवडे यांची व्यथाकळा, कृष्ण माधवांचे श्रावण लावण्य, श्री जयइंगळे यांचे विनाशाचा सोयरा ’ हे, दुपारीच्या एकांत निसर्गाला संवादी वाटणारी एकटी लेकुरवाळी, श्री जीवनकुमार स्व. राठी यांचे विटिदांडू खेळणारे बाळपण,काशीनाथ सुतांची उदवत्ती, झटाले यांचे जीवनाचे मोजमाप, श्री शेषराव पाटलांचे ‘ हेवा ’ हे आकाशचित्रण, रामपुसदकरांचा दर्पण, इ. सर्व कवीच्या दीर्घ जीवनाच्या साक्षी आहेत.

अर्थातच हे पुरावे नव्या आणि जुन्या अशा दोन्ही तऱ्हेच्या दोषांनी ग्रासलेले आहेत. पण उद्यापर्यंत ग्रासणारी मंडळी कवीच्या नजरेस येतील व त्यांचे स्वतःचे तेज (जे आजकाल दुर्मिळ होत चालले आहे)जोमाने प्रगटेलच. जादा अधिकार वापरुन त्यांच्या सतत आपुलकीच्या बळावर त्याच्यांतले कांही दोष दाखविण्याचा उद्धटपणा मी करतो.

विठ्ठल कवींची हृदयाच्या सावलीत ही कविता चपळ वाटत नाहीं. ती जरा दोन जिवांची वाटते. पहिल्या दोनांची व तिसरे चौथे मिळून दोघांची अशा दोन कविता तेथे वसतीला आल्याचा भास होतो. श्री सुधाकर लोखंडे यांचे निळे स्वप्न केवळ शेवटचे कडवे शिल्लक ठेवूनहि प्रगट करता आले असते. कसायाच्या क्रूरतेनें आपल्या ओळी आपणच काटल्याशिवाय ‘ थोड्याहि रचनेत आशय कधी मोठा ’ साधत नसतो. तसेच श्री शंकर काळे यांनी कवितेचा ‘ चढ उतार ’ साधलेला वाटत नाहीं. शेवटी दाखवावयाची निर्धारगति त्यांनी दुसऱ्याच कडव्यात अधीरपणाने सांगून टाकली. द्वारकानंदाच्या ज्योति कवितेची १–३ किंवा २–३ अशी केवळ दोन च कडवी ठेवूनहि आशय तेवढाच ठेवता येईल. कृष्णमाधव या कविमित्राने शब्दांचा हव्यास सोडल्यास ‘ सात रंगाचा इंद्रधनु ढगा-ढगांत गुंतून गारव्याला उधाळून लपलेला सुगंध ’ उधळू शकेल. मग उधळने या क्रियेसाठी ‘ पांगला ’ या पंगू शब्दाची मदत त्यांना घ्यावी लागणार नाही. त्यांची एकूण कविता अपेक्षा वाढविणारी आहे. शब्दांचाच हा हव्यास श्री. जे. बी. देशमुख यांनीही सोडावा. नाहीतर पहाटेला अस्फूट म्हणत असतानाच ती ताजीतवानी

असल्याची साक्ष उगीचच द्यावी लागेल. त्यांची पहाट ही चोर पावलांनी ठुमकावी हीच त्या पहाटे इतकी रमणीय अपेक्षा त्यांच्यापासून आहे. श्री. श्रीकांत गोवंडे हे भेटीचा जुना पण अजूनहि चटका लावणारा विषय उत्तमपणे हाताळू शकतात. पण '**इथेच जमले प्रेम आपुले।**

**दोन मनाचे मीलन झाले ।।**

असा अर्थाचा आवर्तनी खाक्या नको. श्री जीवनकुमार राठी हे धृपदी पण प्रासादिक लिहितात. पण आजच्या भाषेतले सर्व शब्द वापरल्या नंतर आणि त्यायोगे विटिदांडू, गट्टी-कट्टी, आजीची गोष्ट इ. वातावरणांत वाचक रमल्यानंतर —नव्हे कवीच्या सोबतच हुंदडू लागल्यानंतर शेवटीचा 'तदा' चिपळूणकरी काळातल्या आजोबासारखा आपले डोळे वटारतो. शक्य तोवर भाषेचा एक 'काळ' असावा. मित्रवर्य श्री नन्नोरे यांनाहि प्रेमाची एक सूचना—कालियामर्दनाच्या रुपकांत महागाई या स्त्रीलिंगी जाणिवेस पुतना हे स्त्रीलिंगी रुपक शोभून दिसते. पण लोकदेवकी हे रुपक मात्र पुरुषाला लुगडे नेसवण्याचा प्रकार आहे. कवितेत जोर इतका आहे की वाचणाऱ्याच्या प्रथमदर्शनी ही चूक लक्षातहि येणार नाहीं. पण कवीने वाचकाच्या बेसावध अवस्थेचा फायदा (१) न घेणेच बरे नव्हे का ? श्री तानवडे यांच्याहि सरितेच्या ओघाच्या 'पातण्या' वर वाचक नाराज होणे शक्य आहे. एकभाषीत्वाची ही नदी कवीला अत्यंत वेगवान दाखवायाची आहे ना।? मग 'पातला' हा शब्द तेथे पुऱ्या ताकदीचा वाटेल का ? आणि श्री वामनाग्रजांनी कविता, थोडी सुबोध करावी हेहि त्यांच्या जवळ प्रेमाचे मागणे 'आम्ही' साधली.

प्रेम कविताबघल अधिक विस्ताराने लिहिण्याचा मोह स्थलाभावी आवरलेला बरा. पण प्रेम वैफल्य, विरह, निरोप, भेटींच्या आठवणी इ. काव्यावर सर्व श्री रा. ना. पांडे, ना. गो. खडसे, जे. बी. देशमुख, सुधाकर लोखंडे, रंगनाथ बंदसोडे, केशव बोबडे, श्रीकांत गोवंडे, कृष्णाबापू पाटील इ. कवि आपापल्यापरी प्रकाश टाकीत आहेत. त्यांत श्री शेषराव पाटलांची 'उणीव' वेगळे वृत्त नेसूनहि लावणीचा ढंग दाखविते. रामजोशांच्या 'उष्ण चांदणे विरहा माजी' ची पैजणे तिच्यांत ऐकायला येतात. ती पाटलांच्याकडून श्रृंगार काव्याची अपेक्षा वाढवितात. त्यातच चिं. गो.

कुळकर्णी यांचा आगळाच मधुचंद्र, काव्यभृंग विशेष उल्लेखनीय, ती सासुरवासीन (महादेव श्रीखंडे) आणि मधुराभक्ति अद्वैतापर्यंत नेऊन सोडणारी 'तूं आणि मी' इ. सुंदर आहेत.

भजनांचा उल्लेख करायलाच हवा. कोणी सांगावे? उद्या सर्व गवती भागवती' कवितांचे भारे हलवायाकडे जाऊन जनोन्मुख व भजनोन्मुख रचनाच तेवढी इंद्रायणींत तरेल. सौ. कमलाबाई सोहनी, श्री. मेहरे, यांची धाटणी दामयमकाची आठवण देऊन शब्दांसोबतच अर्थालाहि पुनरावृत्त करणारी शैली ही विशेष) श्री. हरीहर देशमुख (आर्तता विशेष), काव्य भृंग मनोहर सिरास हे उल्लेखनीय आहेत. श्री. गोहने, श्री. बोंदरे व श्री. वसंत देशमुख हे चढत्या उत्कर्षाची ग्वाही देतात. कवि कुसुमांची 'वानगी' ही तर माझ्या प्रस्तावनेपेक्षाहि अधिक काम करते.

आता शेवट—मी कविवर असें लिहावे हे कवींना कितपत आवडेल हे कोडेच आहे. पण कविहृदयाची मला ओळख आहे. माझ्या उण्यादुण्या लेखनाचा त्यांच्या उद्याच्या काव्यावर निश्चितपणें परिणाम होवो व आजची 'वानगी' ही उद्याची विपुलता ठरो. श्री. जय इंगळे यांच्या उत्साहाला तोड नाहीं. एका कवीलाच त्यांनी कवीवर लिहायला लावले. कवीची मतें एककल्ली असू शकतात. अशावेळी माझ्या हेकट मतांचा दोष इंगळेवर हा लेख खाजवून खरुज काढल्या सारखाच कांही ठिकाणी झाला आहे. त्यामुळें चर्चा झाली तर प्रस्तुत लेखकाला हवी आहे. आणि ती मुद्दे सोडून न होण्यानेच या लेखाचा उद्देश साधणार आहे.

असो.

मुधोळकर पेठ, अमरावती<br>
दि. २७–९–६०

**—मधुकर केचे**

———

# स्वागत

‘वानगी’ चे स्वागत करतांना मला विशेष उत्साह वाटतो. गेल्या कांही वर्षांत विदर्भांतील नवजात काव्य प्रतिभेला वेधक पालवी फुटत आहे. इकडे चांगल्याशा मासिक पुस्तकांची सोय नसल्याने बरीचशी उत्तम कविता हस्तलिखितांतच वावरत असते. याची आता सर्वांना जाणीव होऊं लागली आहे. मासिक पुस्तकाच्या सोपस्कारांची वाट न पाहताच ही कविता रसिकांपुढे येऊ धजत आहे. एखादा धडाडीचा संपादक मग असल्या काव्याची ‘नव्हाळी’ रसिकांना सादर करतो. ह्या ‘नव्हाळीची’ नवता संपत नाही, तोच एखादा काव्यसंमृद्ध ‘मेळा’ आपल्या भेटीस येतो. असल्या या सामुदायिक संकलनासोबतच वैयक्तिक संग्रहहि भल्या उत्साहाने उजेडांत येत आहेत. या सर्वांतून विखुरलेल्या मुक्तप्रतिभेचा विहार ध्यानांत घेतला म्हणजे मन प्रसन्नता आणि खिन्नता यांनी व्यापून निघते. खिन्नता एवढ्यासाठी की ही प्रतिभा पुलकित व्हावयाला नुसती आसूसलेली आहे. आणि असें असूनहि तिच्या विकासाला पुरेसा वाव नाही. त्याचाच एकदृश्य परिणाम असा होतो आहेकीं अनेक कवींच्या कवितांची संयुक्त संकलने बाहेर पडत आहेत. एका पोलादी वलयाला वाट फोडण्याचा हा प्रांजळ आणि प्राप्त प्रयत्न आहे. एवढे मनांत वागविल्यार असल्या संकलनाच्या स्वागताचें महत्व आणि अगत्य कोणालाहि सहज समजावें.

प्रसन्नता वाटते ती एवढ्याकरितां की यांतील काव्याचें कोंभ केव्हां-तरी निश्चित बहरतील; हमखास फुलतील, फळतील! कांही उगवत्या काव्यांकूरांतील वर्धमान चैतन्य पाहिलें कीं त्यांच्या उज्जवळ भवितव्याविषयी शंका उरत नाहीं. ही रोपटी अगदी करारीपणाने मोठी होणार असें आपल्याला पहिल्याक्षणींच जाणवून जाते. एका वैभवशाली भवितव्याची ही पूर्णछाया आपल्या मनोवृत्तींना प्रसन्न करून सोडते. यांतील दुसरीच कविता (उ. रा. गिरी यांची ‘निर्मिति’) माझ्या विधानाला साक्ष राहील. अशा या अनु-भवाला वानगीहि अपवाद कशी असू शकेल? ‘निर्मिति” (उ. रा. गिरी), ‘आज पहाटेला’ (बाबा मोहोड), ‘निळे स्वप्न’ (सुधाकर लोखंडे),

'जीवन-निर्झर' (शंकर काळे), 'श्रावण लावण्य' (कृष्ण माधव देशमुख), 'शोध' (केशव काळे), 'विनाशाचा सोयरा' (जय इगळे), आदि कितीतरी काव्यांची साक्ष आशादायक ठरते.

ही 'वानगी' बहुरंगी आहे. तिच्यांत अनेक 'वान' आहेत. ते सारेच गोजिरे वाटतात. रचनेच्या दृष्टीने यांतील कांही कवि अलिकडील नवपिढीच्या प्रभावळींत मोडत असेल तर कांहीं तांबे-बालकवींच्या पंथापर्यंत पोचतात. कांहींची शब्दकला आणि प्रतिभासृष्टि यांच्यातून पाडगांवकरी-लकबी, कुठे मध्ये डोकावतात. खरे म्हणजे गेल्या तपभरांत गाजलेल्या कांहीं कवींच्या वैयक्तिक वैशिष्टयांची आठवण यांतील कविता वाचतांना होते. असे होणें स्वाभाविक आहे. पण या पलिकडे या वानगींतून कांही अधिक गवसते म्हणून वाटणारे समाधान मोठे आहे.

विरहाच्या विविध सूक्ष्मोत्कट छटांना शिल्पित करणाऱ्या कवितांत बाबा मोहोडांचें 'पहाटेचे स्वप्न' खूब बोलके आहे. चारसहा ओळींत विशाल अर्थाशय सामावला आहे. स्वप्नांतील लाजरें मीलनहि विरहाच्या व्यथेला विरंगुळा देणारे ठरावे, हें स्वाभाविक आहे. पण त्यांतून रसिक हृदयाला स्पर्शू पाहणारी विरहाची उत्कटता कवीने न सांगताच सांगून टाकली आहे. त्यामुळे केवळ एक दरवळ मनांत जाणवत राहते. येथला आटोप अर्थपूर्ण वाटतो. केशव बोबडे यांची विरहात्म 'भावकळा' अशीच अलगद्‌पणे व्यक्त झाली आहे.

**दूर दूर जातांना अश्रूंची ज्योत जळे**
**शब्दाविण भावकळा तुला कळे मला कळे**

तशींच विशेष प्रपंचावाचून ती वाचकांनाहि कळते. केशव काळे यांचा 'शोध' हि हुरहुर लावणारा आहे. यांतील विरहाच्या आर्ततेंत प्रतिभाहि शिरली आहे. त्यामुळें स्वाभाविकच एक स्वप्नाळू वातावरण तयार होत गेले. आणि कांहींशा स्वप्नाळू प्रतिमांनीं तें आणखीच जाणवणारें ठरले. शेषराव पाटील यांच्या 'उणीव' मधील विरहाची धार कांहींशी सौम्य आहे. कदाचित हा विरह क्षणिक आहे म्हणून असें असेल !

**दूर जातां, विरहाचा**
**नाथा, उन्हाळा भासतो**

एवढ्या हळव्या हृदयाची ही विरहव्यथा आहे. पण त्या मानाने त्याची उत्कटता मंद वाटते. बोथट प्रतिमांचाहि हा परिणाम असू शकेल. विरहाच्या चटक्यांनीहि न करपणारी प्रीति 'अजून आहे' मध्ये जे. बी. देशमुखांनी रेखाटली आहे. प्रीतीच्या भक्ताजवळ ध्रुवाचा आग्रह दिसतो. रंगनाथ बंदसोडे यांच्या दोन कविता ('वितळलेले मेघ पापणींतले' आणि 'बदलीस तूं दैव बिघडलेस !') प्रीतिवैफल्याची साक्ष देणाऱ्या वाटतात. दुसऱ्या कवितेंत एक जहाल जळफळाट आहे. पण त्याला काव्यदर्जा लाभवून देणारी गोविंदाग्रजाची तळतळ येथे नाहीं.

'मला वाटते दीपशिखेवरी आत्म सर्मपित व्हावें' हें "मला न वाटे" मधील वाटणे श्री. देशमुख यांच्या नेहमीच्या शैली ढंगानेच सांगण्यांत आले आहे. जाणत्या रसिकांच्या ते चटकन लक्षांत येते. मीलनाचे 'निळें स्वप्न' सुधाकर लोखंडे यांनी चितारले आहे. त्यामुळें खास असा ठसा नाहीं. प्रीतीच्या राज्यांत बहुतेक कवींनी येथे विरहच आळवलेला दिसतो.

बोलके चित्रीकरण करणाऱ्या कवितांत 'श्रावणाचें लावण्य' (कृष्ण माधव देशमुख) मनांत भरतें. पण दरवळत्या-- विशेषणांचा वापर अधिक चपखलपणे कवीने केला असता तर या लावण्याची धुंदी अधिक प्रत्ययजनक ठरली असती. लावण्याचा शोध करण्याची रसिकांची खटपट टळली असती. 'जलबिंदूंनी डवरलेली' अस्फुट (आणि तरीहि 'ताजी-तवानी ?) चोर पावलांनी ठुमकणारी ही पहाट (जे.बी.देशमुख) आपल्या कानांत हळुवार हितगुज करते. एखाद्या कुलवधुला शोभून दिसणारा विनय कवीला पहाटेच्या मंद-परन्यासांत जाणवला. कल्पना निश्चित हृद्य आहे. पण तिचा अविष्कार मुग्ध राहिला. संदिग्धता व सूचता यांतील साम्यवैषम्य कवीने मार्मिकपणें विचारांत घेणें आवश्यक वाटते. अखेरच्या कडव्यांतील नीलांबर व कृष्णधरा यांच्य मीलनप्रसंगी मात्र मराठी रसिकांना अभावितपणें बालकवींची आठवण होते.

याच बैठकींतली 'दुपार' (सुधाकर लोखंडे) मनाला चटका लावते. मीलनोत्सुक त्या पहाटवधूच्या मानाने लेकूरवाळी दुपार अधिक सजीव उतरली आहे. वेचक तपशील भरुन संपूर्ण दुपार कवीने कलात्मक रीतीने जाणवून दिली आहे. दुपारच्या वेळीं मनाला डंख करणारा विषण्ण शुकशुकाट स्त्रवता ठेवला आहे. 'एकलीच धार एक', 'शीळ भरणारा समीर', 'सुस्तावत

पहुडलेल्या गाईम्हशी ' आणि ' पिंपळाच्या छायेंत धुणे धुणारी एकटीच लेकुरवाळी ' यांच्या द्वारा कवीने दुपार तर सरुप केलीच, पण दुपारला तिची स्वतःची असणारी निवान्त अन् विशण्णवृत्ति कवीने या तपशीलांतून पाहती ठेवली आहे. हे जें दुपारचे (Spirit) आहे तेंच कवीला गवसल्याने ही कविता सजीव वाटते. बालकवींच्या निरागस निसर्ग काव्याची मोहिनी अनेक कवींच्या मनांत अजूनहि रेंगाळते. अनेक कवनांतून ही मोहनी प्रतिबिंबित झाली आहे. 'हर्षून मनीचे तेज फांकले ' अशा काव्यांतून हे ' बालकविपण ' प्रमाणातीत जाणवते. निसर्गाच्या प्रांजळ व सुस्वर सहवासांत ' वामनाग्रज ' कवि अन्तर्मुख होऊन त्याला भावनांतील स्वार्थाची किळसवाणी याद यावीं, हे स्वाभाविक आहे. अर्थात कवीचे प्रमुख अवधान येथे ' स्वार्थी ' कडे असल्याने मदतीसाठी घेतलेला निसर्ग त्याला निश्चित साहाय्यक झाला आहे. भास्कराच्या आगमनांत या कवीला म्हणूनच बहुरंगी रंगाकृत्या दिसत नाही. तो सरळ पण स्वानुकूल रीतीने रोखठोक सांगतो—

**" वसुंधरेवर भास्कर आला**
**नवतीची उधळाया किरणें "**

[ आम्ही—वामनाग्रज ]

' नवतीची किरणें उधळणारा भास्कर ' त्याज हवा आहे. रंग उधळणारा रवि नको आणि ते उचित आहे.

यानंतर वानगींतला तिसरा 'वान' समोर येतो. त्यांत शंकर काळ्यांचा ' जीवन-निर्झर ' लक्ष वेधून घेतो. निर्झरासारखीच या काव्यांतील शब्दरचना धावती आहे. आशय गंभीर असूनहि निर्झराच्या उल्हसित खेळकरपणा कवितेंत खेळतो.

**जालत अखंड जोवरी जीवन**
**साधत साधना नाही काळ-भान**

असा आहे या काव्यांतील जीवन प्रवृत्तीचा छंद. तो अर्थप्रसू शैलीने शब्दबद्ध करण्यांत कवीला यश मिळाले. निर्झरानंतर 'नदी'हि (जे. बी. देशमुख) अवलोकनीय आहे. अेका ठराविक पद्धतीचा कल्पनागौरव यांत बरा उतरला.

**भाग्य आहे या नदीला**
**कुठे तीर्थरूप व्हावे.....**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38890 वि: 21.45
क्रमांक 2868 नोंद दि 28-8-64

अशा या पक्व अखेरींत ही नदी उत्कर्षित होते. इवलिशी 'ज्योति' हि (द्वारकानन्द) कविता जीवाच्या मानाने स्वप्रभेने लुकलुकणारी आहे. कांहीसा बोधगर्भ असणारा आशय श्री. जय इंगळे यांनी एका निराळ्या पण संस्कृत प्रतिमेतून साकार केला आहे. कविता 'बोधशील' असली तरी तिचा कलात्मक पिंड जाणवल्याखेरीज राहत नाही. हेंच श्री. इंगळे यांच्या यशाचें माप !

'कालियामर्दन' ही नन्नोरे यांची कविताहि रूपकनाविन्यामुळे उल्लेखनीय आहे. परिस्थितीचे प्रांजळ प्रतिध्वनि या कवितेंत ऐकूं येतात. काव्यभाव समाजनिष्ठ असूनहि एक पीळ असल्याने कविता कंटाळवाणी झाली नाहीं.

उदबत्तीचा (काशीनाथ सुत) काव्यगंध आपल्या मंदगतीने अवघा आसमंत मोहित करणारा आहे.

**सर्वस्वाचे वाहोन कलेवर खुलवित देवाचे मंदिर**
**भक्ति माझी कीर्ति त्याची पायधुळीं मी पडेन त्यावर**

उदबत्तीच्या उदास जीवनाचा कळस या शब्दांतून कवीने साधला आहे.

आणखीहि अनेक तऱ्हांचे 'वान' या काव्य करंड्यांत पहायला मिळतील. त्या सर्वांच्या एकत्रित आस्वादाची ही 'ओसरी' नव्हे तेव्हा पाय पसरण्याचा उपयोग आवरता घेतला पाहिजे. पण तसें करण्यापूर्वी श्री. हरीश मानधना यांच्या अभंगाची मुद्दाम राखून ठेवलेली स्मृति उफाळून येते. अभंगातील हृद्य भावगंध अंतःकरणाला स्पर्श करतो. सर्व दृष्टींनी हा अभंग मला पूर्ण अन् यशस्वी वाटतो. एक अतीय उत्कट अन् उदात्त वृत्ति कवीने तितक्याच प्रतिभा कौशल्याने अभंग करून ठेवली आहे.

माझे विचार मांडायला संधि दिली म्हणून संपादक-मंडळाचे आभार मानतों. अधिक उणे असल्यास माफ व्हावें. हें मागणें आहे.

रुक्मिणीनगर, **अमरावती**
दि. ३०-९-६०

**—रु. पां. पाजणकर**

---

ज्यांनी वानगीला कवितेची वान पडूं दिली नाही, त्या चाळीस कवि सुहृदांचे व त्यांच्या रचनेचें मनापासून कोड कौतुक करणारे प्रा. मधुकर केचे, व प्रा. रु. पां पाजणकर यांचे आम्ही अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

गुरुवर्य अ. ना. घोडे यांचें तळमळीचें सहकार्य असेच लाभत राहो ही एकमेव अपेक्षा.

श्री. रू. बा. कडू, नि. रा. देशपांडे, मो. रा. पुनसे, व डॉ. ल. वा. पडोळे या मान्यवरांचे मार्गदर्शन सदैव लाभो ही सदिच्छा.

मित्रवर्य गिरीश राठी, श्रीपाद भाटे, वानगीचे चित्रकार जय वर्मा, श्री. शे. ल. शेळके यांचे आभार व्यक्तवितांना देखील संकोच वाटतो. राष्ट्रभाषा प्रेसचे व्यवस्थापक श्री. रा. तु. देशपांडे यांनी मोठ्या आस्थेने छपाईचें काम हाती घेऊन तत्परतेने पार पाडलें, या बद्दल त्यांचे आभार मानण्यापेक्षा, त्यांचेकडून असेच सहकार्य मिळत राहो, हीच आम्ही अपेक्षा करतों.

संपादक

# ★ वानगी ★

## कविता

एकच कविता ऐसी व्हावी
विवस्तताचे तेज दिपावे
बघतां बघतां मनांतल्या अन्
इंद्र धनुवर रंग फुलावे

एकच रमणी ऐसी व्हावी
शुकाचारी वैराग्य विरावे
भुवई चळतां एक वाकडी
प्रणयार्तांचे थवे जमावे

एक प्रतिक्षा ऐसी व्हावी
रविचंद्राचे दिप विझावे
आणि अमेच्या काळोखाला
नव तेजाचे कोंभ फुटावे

—म. ल. वराडपांडे

## निर्मिति

भरुन आले आहेत
श्यामल निळे भावमेघ,
तृप्त मनाविकाशांत
नाचतो आहे शब्दमोर
आशय पिसारा फुलवून
कल्पनेच्या रघन बनांत;
नि गुणगुणत आहे
प्रमत्त कवितालांडोर
धुंद छंदलयींत—
'नाचरे मोरा,

—उ. रा. गिरी

## लाखेचा मणि

तव नयन घटाला
स्वातीचे जल पिण्या—
लाविला अधराचा शिंपला
गवसला शाश्वत मोती मला
तो मोती अर्पूनि तुजला

बनलों तन्मणी; तव मनीचा—
अवचित तो मोती फुटला,
लाखेचा मणी निघाला !

—जे. बी. देशमुख

## आज पहाटेला

आज पहाटेला
आलीस स्वप्नांत
बोलली लाजत
कांही तरी
तुझें तितुकेंच
पुरें आहे आतां
सोसायला व्यथा
वेदनेची !

—बाबा मोहोड

## हृदयीच्या सावलीत

'स्वधर्मे निधनं श्रेय:'
सर्वांच्याच मुखी असे
–विज्ञानाच्या जगामध्यें
मुख फक्त बडबडे ! १
'परधर्मो भयावह'
अनेकांच्या जीवनाचें
लक्षवेध, ठार होई
हृदयाच्या सावलींत ! २
हृदयीच्या सावलीत
आशा नवी पेंगुळते
नाही वाट खवचट
आंत आशा हेलावते ! ३
कधी कधी टुकटुके
राखणीची जुनी आशा
परि खाई टोला एक
व्यवहारी जीवनाचा ! ४

—विठ्ठल

## निळें स्वप्न

रूप तुझें मोहकच
लावी मज हुर हूर
मोहांतच गुंतवून
मनीं उठवें काहूर १

रूप तुझें पाहिलें मी
गोड एका सायंकाळीं
होती पसरली तुझ्या
मुखावर रम्य लाली २

भिरभिरत नेत्र होते
घेत कसलासा शोध
तुझ्या लोचनांत झाला
मला कांही गूढ बोध ३

तुझ्या आकाशी डोळयांत
निळें स्वप्न तरंगत
आपुल्याच मीलनाचें
चित्र होतें तें रंगत ४

—सुधाकर लोखंडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 36680 दि: 3155
वा न गी
क्रमांक 25681 दि 25-9-

## जीवन-निर्झर

डोंगर वाळूचे
वाळू आसपास
थोर वाळवंट
अफाट भकास १

पदोपदीं क्लेश,
निराशा अंधार
तरीही अंतरी
आशांचे अंकूर २

नीरस वाळूच्या
शिरून पोटांत
जीवन – निर्झर
वाहतो मोदांत ३

तापतो अंगार
भास्कर नभांत
रेताळ टेकड्या
आडव्या मार्गांत ४

धावतोच पुढे
आपदा सारत
फुलवी जीवन
मढें जगवीत ५

आपुल्या छंदात
रंगात रंगून
चालतो करीत
स्वर्गाचें निर्माण ६

करीत वाहतो
कालावर मात
अंधारांत जैसी—
प्रकाशाची ज्योत ७

सांगतो जगाला—
"रेताळ रानांत
यत्नाने सापडे
अमृत कणांत ८

ठेवलाच आहे
एकदा विनाश
फुलांत, काट्यांत
निरंतर 'ह्रास', ९

चालत अखंड
जोवरी जीवन
साधत साधना
नाही काल-भान १०

—शंकर काळे

## या नदीला

'आंस' आहे या नदीला
जल दान सदा द्यावें......
'वेड' आहे या नदीला
खडकांत खळाळावें........
'ओढ' आहे या नदीला
सागरीं संलग्न व्हावें......
'ध्येय' आहे या नदीला
यत्न-कष्टें पुढेच जावें.......
'भाग्य' आहे या नदीला
कुठे तीर्थरुप व्हावें.......

—जे. बी. देशमुख

## वितळले मेघ पापणीतले !

वितळले मेघ पापणीतले
विझवायाला ज्वाला मुखिरे तुझ्या अंतरांतले ॥ घृ ॥
वर्षा मागुनि वर्षें गेलीं
कहाणि आपुली पुरी न झाली
दिवसेंदिवस निघालें वाढत दुःख अंतरातले ! १
जुल्मि जगाने लोपवलेली
आठवीत ती दुनिया अपुली
जीवन माझे जळत निघालें तुझ्या विरहांतले ! २
संसाराचे बंध तोडुनी
आठवणींनी धुंद होवुनी
धावति माझे तुझ्या दिशेला प्राण शरीरांतले ! ३

—रंगनाथ बंदसोडे

## तुला कळे

तुझि माझी एक व्यथा
आकाशा देत तडे
अंतरिच्या पोकळींत
दुःख झुरे आगळे
दूर दूर जातांना
अश्रूंची ज्योत जळे
शब्दाविण भावकळा
तुला कळे मला कळे

—केशव बोबडे

## ज्योति

इवलीशी ज्योति
सदाच उजळी
रातर काजळी
स्वप्रकाशें.

चुकल्या पथिका
वनीं घनदाट
दावी पाऊलवाट
घनतमीं.

माझी प्राण ज्योति
रंजल्या गांजल्या
खंगल्या पिडल्या
जीवासाठीं.

—द्वारकानंद

## श्रावण लावण्य

श्रावण लावण्य धुंद
सांज ऊन पांघरून
उन्मत्त क्षितिज रंग
विस्कटले झाकळून.

वळवाचे संथ थेंब
दूर चिंब पावलांत
ढळत वीज आंधळी
आसमंती लोचनांत.

सप्तरंगी इंद्रधनु
ढगाढगांत गुंतला
गारव्याला उधाणून
सुप्त सुगंध पांगला.

मौनमत्त धुंद ऊब
पिंपळाच्या सावलींत
डोळें मिटून अंधुक
स्तब्ध पंख झोपलींत.

धरित्रीला झोंबतात
डंखणारे स्वप्नबंध
सांज ऊन पांघरून
श्रावण लावण्य.

—कृष्णमाधव देशमुख

## पहाट

अंधाराच्या सरोवरांतुन
जलबिंदूंनी डबरलेली
अस्फुट ओली नि ताजी तवानी
पहाट अलगद वर आली.

वृक्षपर्णांतुन किलबिलली
यंत्रजा त्यांतून घरघरली
जमिनीवरती लोळण घेता
गोठ्या गोठ्यांतुन हंबरली.

अफाट हिरव्या मैदानावर
मुग्ध उन्हाची तिरिप कोवळी
ठुमकत आली चोर पावलीं
शांत निरामय मधुर सकाळी.

सोनरेशमी हात प्रभेचे
नीलनीवल हें धुकें सारिते
नीलांबराचे कृष्ण धरेशीं
मधु-मिलन मग तिथे रंगते.

—जे. बी. देशमुख

## विनाशाचा सोयरा

अहंपणाची चंचल नारी
बदनामीच्या उभी दारीं
तिच्या आहारी जो कां गेला
विनाशाचा सोयरा झाला

—जय इंगळे

## शोध

जेव्हां मी पाहिलें
स्मृतीच्या डोळ्यांत
कल्पना तळ्यांत
रूप तुझें.

क्षण रेंगाळतां
स्वप्नांतील आस
केवळ आभास
आता तुझा.

स्मृति–पापणीची
धरूनिया कडा
बैसला हा वेडा
भेटी साठी.

स्वप्नाच्या डोहांत
लागता चाहूल
टाकले पाउल
शोधण्यांस.

--केशव काळे

## दुपार

निळयाशार आभाळांत
मेघमाला तुरळक
उंच विहरते त्यांत
एकलीच घार एक. १

टेकडीच्या पायथ्याला
वाहे खटचाळ ओहळ
शीळ भरी आसमंती
मंद समीर शीतल. २

तळ्याच्याच कांठावर
हिरव्यागार तृणांत
शुभ्र काळया गाई म्हशी
पहुडल्या सुस्तावत. ३

भर दुपारच्या वेळीं
पिंपळाच्या छाये खालीं
धुणीं धुते कुणी तरी
एकलीच लेकुरवाळी. ४

——सुधाकर लोखंडे

## मला न वाटे

मला न वाटे देवासम मी अमृत पिउनी अमर बनावें
तव नयनाच्या गगन घटांतील चातकतृष्णा प्राशित जावें
मला न वाटे इंद्रधनूवर स्वार होउनी खूप फिरावें
सरसावूनि तवभृधनुला कामबाण मी नित उधळावे
मला न वाटे पक्षासम मी नील अंबरीं उंच उडावें
स्मृति-पाखरुं तुझेंच बनुनि मानस-पंजरीं झोले घ्यावे
बघतो जेव्हा पतंग अगणित मालवितांना दीपज्योतिला
मला वाटतें दीपशिखेवरी आत्मसमर्पित आपण व्हावें

—जे. बीं. देशमुख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत 3160
अनुक्रमांक 3160 वि: वानगी
क्रमांक 9568 नों: दि: 98-6-8

## अखेरची भेट

इथेच झाली भेट आपुली
आणि जाहल्या गप्पागोष्टी !
इथेच तुज मी प्रथम पाहिले
निःशब्दांचे बोल ऐकिले !
इथेच मी तव श्वास ऐकिले
हातीं तव मी हात गुंफिले !
इथेच जमले प्रेम आपुलें
दोन मनाचे मीलन झालें !
खेळ आपुला आज संपला
नकोस पाहूं फिरून मजला !
आज तोडूयां प्रीति धागे
नकोस येंऊं माझ्या मागे !
परललना तूं उद्या होशिल
भकास माझें जीवन होईल !
पुंस डोळे दुःखी कां अशी ?
नको गुंतवूं मन माझ्याशी !
आज आपुल्या गांठी सुटल्या
दोन वाटा आता फुटल्या !
जा ! जा !! रजनी आली
अखेरची ही भेट आपुली !

—श्रीकांत गोवंडे

## रम्य तें बालपण

अहा ! किती रम्य तें बालपण
नच येती फिरून ते क्षण ॥ धृ ॥

क्षणांत कट्टी, क्षणांत गट्टी
वृत्तिच अमुची भारी हट्टी
होण्या पूर्वीच अम्हां सुट्टी
देऊं कशी शाळेला बुट्टी ! अहा.........१

विटी-दांडु कधि पतंग गोळ्या
शिवाशिवीस्तव शिवाजीच्या टोळ्या
धम्मक लाडु कधि चापट पोळ्या
तहान-भूक ही विसरती वृत्ति भोळ्या ! अहा.........२

मधेंच जावें आजी पाशी
ऐकायाला गोष्ट छानशी
'न' म्हणतांचि धमकी तिजशी
असे अम्ही कहाणीचे आधाशी ! अहा.........३

उडवितो आम्ही इतरांची टर
कोणाचाहि आम्हां ना डर
गम्मत वाटे तदा खरोखर
आई-बाप होती बेजार ! अहा.........४

—जीवनकुमार स्व. राठी

## बदललीस तूं दैव बिघडलें !

बदललीस तूं, दैव बिघडलें
जगांत माझे नांव हमेशा, बदलौकिक जाहलें
बदललीस तूं, दैव बिघडलें ॥ धृ ॥

तुझेच पटले बोल जगाला
निर्दोषी तूं, न्याय जाहला
अपराधी मी ठरलों, मजवरी जन सारे खवळले
बदललीस तूं, दैव बिघडलें. १

कोणाची तुज भीति वाटली ?
आपण दोघे असतां जवळी
तुझ्याच हस्तें तुझें नि माझें जग सारे बदललें
बदललीस तूं, दैव बिघडलें. २

पतित जाहलों तुझ्या विना मी
जग म्हणते मज 'निमक हरामी'
जिवंतपणि मज मरण पातलें तुझ्याच प्रीतीमुळे
बदललीस तूं, दैव बिघडलें. ३

बोललीस कां अखेर खोटें ?
तोडिलेंस कां अपुलें नाते ?
घडविलास कां प्रेमभंग तूं प्रेम असुनि आपुलें ?
बदललीस तूं, दैव बिघडलें. ४

—रंगनाथ बंदसोडे

# निरोप

नको रडूं तूं पुस हे डोळे, येतें हृदय भरून
जाण्या पुढती पाउल माझें बघ उचले न अजून ॥ धृ ॥

कशास आपण जवळी आलों ?
हांसत खेळत मोठें झालों ?
हृदयाने अन् एक जाहलों जगास या विसरून. १

हसतें फुलतें जीवन अपुलें,
फुलण्या आधिच अवचित सुकलें
प्रेमाचा तो लुकलुकताही गेला दीप विझून. २

मार्ग आज हे भिन्न आपुले
भिन्न दिशांना ओढुं लागले
त्या वाटेने मृत हृदयाने प्रवास आज इथून. ३

दैवा पुढति न इलाज अपुला
उगाच करशी दुःख कशाला ?
हांस एकदा हांस पुन्हा तूं, ओले नयन पुसून. ४

निरोप दे मज आनंदाने
जातो माझ्या मी मार्गाने
आठवणींची स्मृति-चित्रें ती हृदयाशींच धरून. ५

—कृष्णा बापू पाटील

## कालिया मर्दन

हलाहलाने स्तन भरलेली
महागाई ढोंगी पुतणा
आज मारण्या गोकुळीं आली
जगता मधल्या लाखो कृष्णा
थैलीशाही कंसमामा
जन्मा आधी मारे पुत्र
लोकदेवकी करते शोका
परि वसुदेव तो परतंत्र
आकाशवाणी सांगे कंसा
तव शत्रु रे आला जन्मा
विकासाच्या यशोदेला
भरभर फुटला तेव्हा पान्हा
अण्वस्त्रांचा नाग कालिया
विश्वडोही फूंऽ फूंऽ करतो
पशुपक्षावानी मानव
प्राशुन जल तो पटपट मरतो
शांततेचा मर्दन करण्या
कृष्ण टाकतो उडी डोहांत
बोंबा मारे काठा वरले
मेला मेला म्हणूनी रडत
हे करंटे सारे रडके
चाणुर मुष्टिकांचे बंधू
मल्लपणाचा पडदा हटुनी
चीत होतिल नकली भोंदू
सुहास्य करुनी दारिद्र्याची
राधा घालिल विपूलतेची
माळ गळ्यामधि दीन बंधूच्या
वाजिल वेणू मग सौख्याची

—गोविंद नन्नोरे

## धन्य महाराष्ट्र

धन्य महाराष्ट्र जगी वंद्य जाहला
भारतांत श्रेष्ठ असा देश शोभला ॥ धृ ॥
धन्य शिवछत्रपती शूर वीर ते
योग असा अपूर्व हा जन्म घेतला ॥ १ ॥
'जन्मसिद्ध हक्कास्तव' एकभाषि राज्यास्तव
प्राणपणें करुनी यत्न आज मिळविला ॥ २ ॥
निर्मियले द्वैभाषिक, अल्पायु ठरलें ते
एकभाषि सरितेचा ओघ पातला ॥ ३ ॥
यशप्राप्ती व्हावयास पुण्याई शिवप्रभुची
रक्षुनिया राष्ट्रधर्म दीप उजळिला ॥ ४ ॥
आशीर्वच भारतीया, रक्षिण्यास स्वातंत्र्या
सबल करा आज महाराष्ट्र आपुला ॥ ५ ॥

—वि. बा. तानवडे

## टिकेल कां

आगित ओतें तेल आणखी
रक्त पिपासू दानववृत्ती
टिकेल कां पण वैभवाची ?
भुकज्वालामुखि केलि वस्ती

—वामनाग्रज

## उदबत्ती

मी उदबत्ती, मी उदबत्ती
राहिन एकलकोंडी जगतीं
स्वार्थ मला नच शिवे मनीं
मी तर कारण उदबत्ती १
रूप ओंगळें लाजिरवाणें
सर्वस्वाविण नुसतें जगणें
जगता साठी मी जगते
मी तर कारण उदबती २
शरीर माझे झिजते जळते
चंदन मज पाहतां लाजते
त्यागांतच मज जीवन शोभे
मरणांत खरी मज कीर्ति मिळे ३
मशीद मंदिर घरकुल माझें
कधी स्मशानीं मी जळते
राखेंतच माझें मी पण उरत
मी उपेक्षित उदबत्ती ४
रंग असें पण रूप नसें
दगडी हृदयाची मी गमते
प्रेमाने नच कुणी बोलवे
प्रेमच मिळतां मी जळते ५
सर्वस्वाचे वाहीन कलेवर
खुलवित देवाचें मंदिर
भक्ती माझी कीर्ति त्याची
पायधुळीं मी पडेन त्यावर ६

--काशीनाथ सुत

## मला वाटते

मला वाटते--
गीत होउनी
स्वप्न भूमिचें उजळ करावें
तिचा निरंतर दास होवुनी
यश गंगेचा
धनी बनावें !

मला वाटते--
प्रभात होउनी
अंधाराला प्रकाश द्यावा,
देवा घरची जादु होउनी
विहार येथे
स्वैर करावा !

मला वाटते--
जीवन होउनी
तृषत जनांच्या कुशींत जावे
जीवनासहि जीवन अर्पुनी
कृतार्थ व्हावें !

—वसंत खोंडे

## मोजमाप

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्रसुतीच्या वेदनेनें
माता दुःखी रडे
पुत्र जन्मीं मोद पित्या
गांवीं वाटे पेढे
सवतीच्या अंगाचा
हो तिळपापड
ज्येष्ठ पुत्र घेई तीचा
प्रेमें खूप कड
जरी एका मातीचे
बनले सारे रांजण
तरी न ये मोजता
एका मापे जीवन

—उ. आ. झटाले

## हेवा

विसावला रविराज
क्षितिज - अंथरुणांत
सुगृहिणी लगबगा
पाजळती सांजवात १

मनीं वात्सल्य अुमाळा
वत्सा चाटतात गाई
पान्हावलेली माऊली
सानुल्या कुशींत घेई २

श्रांत जीव विसावती
आकाशाच्या दुलईंत
तया घेऊनिया अंकीं
जगते काजळी रात ३

देखूनी धांगडधिंगा
नभीं चंद्रतारकांचा
वाटे, हेवा मानवाला
त्यांच्या सुखी जीवनाचा ४

—शेषराव पाटील

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 38890 दि:
वानगी
क्रमांक 7६०२

# निर्धार

तुझ्या उत्सुक दर्शना
उभा तिष्टत केव्हाचा
रोष तुझ्या पुजाऱ्यांचा
माझ्यावरी. १

झालें उतावीळ मन
कसा येऊं मी रे आंत ?
आड रुढीची ही भींत
तुझ्या माझ्या. २

संत सांगती गर्जून
तुला नाही जात पात
मग कां रे देव्हाऱ्यांत
स्तब्ध अता ? ३

त्यजिलें मान धना
देवा बाप्पा लाज राख
हीच माझी कळ देख
अंतरीची ४

दर्शनाविण रे तुझ्या
येथून ना हलणार
केला पक्काच निर्धार
देवराया. ५

—द्वारकानंद

## दर्पण

चहुं दिशांची चौकट
माझ्या अंगांना भीडली
साऱ्या चांदण्यांची छाया
माझ्या दर्पणीं रेखीली १

बहरल्या पुष्पवेली
सौंदर्याने, धुंद मनीं
खंगलेल्या वृक्षांनाही
स्थान माझ्याच दर्पणीं २

मायानंदी बुडलेले
मुख स्वतःशीच हंसे
वैफल्याचें कारुण्यही
ओठे त्याच्यावरी ठसें ३

डोले रुधिर कमल
साज मौक्तिक थेंबांचा
आंत हळुच डोकावे
सडा काळचा चिखलाचा ४

कुणी हंसे कुणी रडे
सारी कहाणी सांगून
मौनानेच होई माझ्या
त्यांच्या मनाचे सांत्वन ५

कुणी तृप्त पापा घेई
अतृप्ताच्या लाथा गोड
दुःख कळे ज्याचे त्याला
मीना अश्रु जसे कोड ६

—राम पुसदकर

## सासुरवासीन

सासुरवासीन मी
मैना पिंजऱ्यांत
स्वच्छंदाचे गाड भूत.
सासुरवासीन मी
गतसारे विसर
जणुं श्रावण सर.

—महादेव श्रीखंडे

## तूं आणि मी

तूं मी होतो
दोघे दूर
सदा वाटे
हूर हूर
तूं मी आलो
आसपास
फूल गंध
एक श्वास
मृत्यु जरा
नसे थारा
तूं मी एक
होता जरा
तूं मी होता
एक मोद
'नेति् नेति्'
म्हणतो वेद

—गोविंद नन्नोरे

## किती कुणास्तव

किती लतास्तव पुलकित झाले
हात तुझे समिरा
किती रजनीस्तव अंध जाहले
नेत्र तुझे तिमिरा
किती पुनर्वेस्तव सुषमा सिंचुनी-ग्रहण लागले
इभ्रतीस तुझिया हिमकरा ?
किती फुलांवर गुंजत फिरले
तव गीत स्वर रे भ्रमरा ?
किती मिथुनांच्या चरणास्तव उठले
रोमांच तुझे तृणांकुरा ?
किती श्रावणास्तव सचैल घडले
स्नान तुझे वसुंधरा ?
किती मेघास्तव पिसार फुललें
हंसले आंसू तुझे मयुरा ?
किती मुद्रांवर गर्द उमटले
ठसे गूढ तव शाईचे अधरा ?
किती रक्तास्तव यौवन फुलले-पुष्प निवटले
तव आसक्तीचे शूर समरा ?

—जे. बी. देशमुख

## माझी काशी

कृष्णा काठीं नरसिंहवाडी
पंचगंगा इथे मिळाली
दत्तदिगंबर इथे निवासी
हिलाच म्हणती दक्षिण काशी !

अहा ! संगम किती मनोरम
जणुं भासतो त्रिवेणि संगम
अनेक तीर्था कशाला जाता
स्थान येथिल मुक्ति देवता !

महात्म्य येथिल असें आगळे
असेल दृढता मनीं तर कळे
पटले ज्यांना ते उद्धरिले
दत्त कितीकां इथे भेटले !

दत्त अमुचे एकच दैवत
रुजली श्रद्धा खोल मनांत
नरसिंहवाडी प्रताप कळता
इथेच माझी काशी आता !

—श्रीकांत गोवंडे

## उडणाऱ्या जावळांत

उडणाऱ्या जावळांत
मज माझें बाल्य दिसें
इवल्याशा नयनांत
मांगल्याची प्रभा गमे १

हासणाऱ्या मुखा मध्यें
अकाराचे तेज दिसे
वाच नाही मुकेपण
बोलविते सारे ब्रह्म २

उललेल्या ओष्ट दळी
अमृताची ओष्ट धारा
चुंबनाने थंड होई
बेसुमार धग माझी ३

रांगणाऱ्या हालचाल
व्यथा माझ्या जाळी आणि
खचलेल्या वेड्या मनीं
हास हसे आशा भावी ४

लोचनीच्या दर्पणांत
चित्‌शक्ति प्रतिबिंबे
अनंताचे अनंतत्व
साठलेले बुबूळांत ५

लाख व्यथा जळे तिथे
आणि दिसे प्रकाशांत
प्रत्यक्षांत आत्मरूप
उडणाऱ्या जावळांत ६

—विठ्ठल

## जर असा कधि प्रसंग आला

जर असा कधि प्रसंग आला
मी मागेन मातृभूमिला
एक हाती घेउनी सत्ता
या विश्वाची, दुज्या हातांत
मातृभूमिला, घेउनी बदला
कुणी, 'दोहोंतुनी माग एक'

मी मागेन मातृभूमिला
जर असा कधि प्रसंग आला

जर मज नेण्या यमदुत आला
'देश सोडिता, सोडीन तुजला,
प्राण प्रिय तर सांग मजला
प्रश्न असला जर कां केला
मी त्यजेन मत्प्राणाला

जर असा कधि प्रसंग आला
मी मागेन मातृभूमिला

—पद्माकर जोशी

## स्मरणांत खरोखर जिव जगते

स्मरणांत खरोखर जिव जगते;
अधि स्मरण विस्मरण ये मग तें ॥ धृ ॥

अनंत स्मरणें अधि स्मरावीं
सौख्यार्हाची आंस धरावी
वाढवि स्मरणचि स्मरणा भावी
मग अखंडपण ये बघ तें ॥ १ ॥

हृदयस्वाचें दान अधी करि
हृदयस्वचं स्वयें तुझ्या घरी
हृदयस्वाचा यज्ञ करी तरी
रे स्वयें सैल बंधन पडतें ॥ २ ॥

सौख्यार्हाचा एकच ठेवा
केवळ त्यागचि मजला ठावा
त्याग मार्ग हो, त्याग विसावा
का त्यागाविण कांही मिळते ? ॥ ३ ॥

राधा—सति त्यागी, दे बळी
चढवि पताका प्रणय मंदिरीं
आणि सर्व सत रूप होवूनि
त्यागेंच पुढे पाउल पडते ॥ ४ ॥

——हरिहर वा. देशमुख

## मनांत येते शतदा ऐसे

मनांत येतें शतदा ऐसे
बालपणाची कळी खुलावी
लपाछपीचे डाव मांडुनि
कथा भाबडी तुज सांगावी. १
मनांत येते शतदा ऐसे
तारुण्याचें फूल फुलावें
वक्षावर तूं खेळत असता
जे नच घडलें तेंच घडावें. २
मनांत येते शतदा ऐसें
अनभवाचें पान पिकावें
अंधप्रेम मग डोळस होतां
दिसेल जें तें दुरून बघावें. ३

—जे. बी. देशमुख

## उणीव

ऊन चंद्राचे प्रखर
अंग अंग रे पोळतें
तुझ्या छायेची रे राया
नित्य उणीव भासते
दृढालिंगण-गारवा
नित्य हवासा वाटतो
दूर जातां, विरहाचा
नाथा, उन्हाळा भासतो

—शेषराव पाटील

## स्मरणांत खरोखर जिव जगते

स्मरणांत खरोखर जिव जगते;
अधि स्मरण विस्मरण ये मग तें ॥ धृ॥

अनंत स्मरणें अधि स्मरावीं
सौख्यार्हांची आंस धरावी
वाढवि स्मरणचि स्मरणा भावी
मग अखंडपण ये बघ तें ॥ १ ॥

हृदयस्वाचें दान अधी करि
हृदयस्वचं स्वयें तुझ्या घरी
हृदयस्वाचा यज्ञ करी तरी
रे स्वयें सैल बंधन पडतें ॥ २ ॥

सौख्यार्हांचा एकच ठेवा
केवळ त्यागचि मजला ठावा
त्याग मार्ग हो, त्याग विसावा
का त्यागाविण कांही मिळते ? ॥ ३ ॥

राधा-सति त्यागी, दे बळी
चढवि पताका प्रणय मंदिरीं
आणि सर्व सत रूप होवूनि
त्यागेंच पुढे पाउल पडते ॥ ४ ॥

—हरिहर वा. देशमुख

## मनांत येते शतदा ऐसे

मनांत येतें शतदा ऐसे
बालपणाची कळी खुलावी
लपाछपीचे डाव मांडुनि
कथा भाबडी तुज सांगावी. १
मनांत येते शतदा ऐसे
तारुण्याचें फूल फुलावें
वक्षावर तूं खेळत असता
जे नच घडलें तेंच घडावें. २
मनांत येते शतदा ऐसें
अनभवाचें पान पिकावें
अंधप्रेम मग डोळस होतां
दिसेल जें तें दुरून बघावें. ३

—जे. बी. देशमुख

## उणीव

ऊन चंद्राचे प्रखर
अंग अंग रे पोळतें
तुझ्या छायेची रे राया
नित्य उणीव भासते
दृढालिंगण-गारवा
नित्य हवासा वाटतो
दूर जातां, विरहाचा
नाथा, उन्हाळा भासतो

—शेषराव पाटील

## मधुचंद्र

दीनमणी तो अस्ता गेला संध्या आली आठवणी
नीलनभीच्या प्रासादांतुन हळु डोकावे रजनी
काजळलेली रात लाडके तिमीर पसरे ती भुवनीं
सांग सखे ग कोण उधळतो फुलें रुपेरी हीं गगनीं ?
चवतीचा तो चकोर चांद लबाड कां हंसतो गालीं ?
ऊमानाया रजनीनाथा बंदिवान केला भालीं
लुकलुक त्या तारा मधुनी आकाशगंगा पाझरते
पाट रुपेरी ओसरतांना वेडे मन कां कालवते ?
जादुगारिण रजनीराणी आज जरी ती काजळते
काजळलेल्या रात्री मधुनी प्रकाश पूर्वी उजळीते
क्षण प्रितिचा हा मोलाचा सखे मनाला रिझविल ग
जीवन कमळे फुलवायाला हाच दिलासा देईल ग
काजळलेला तीळ तसा ग गोऱ्यागाली शोभतसे
तशीच सखये रजनी रमणी नील अंबरी भासतसे
नील नभाचे प्रासादावर मधुचंद्र तो उगविल ग
तोवर सखये तुझ्याच पाशीं बंदिवान मी राहीन ग

—चिं. गो. कुळकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्र
अनुक्रम 3८८९० वि: ३१८४
क्रमांक ७.४.७८ नों दि: ७.४.७

वा न गो

## आर्त हृदय नाचतें

आर्त हृदय नाचतें
सारखे ! आर्त हृदय नाचतें ॥ धृ ॥

गोड कल्पना हृदयीं माझ्या
पुलकित करतीं गात्रा माझ्या
मूर्ति तुझी रे नेत्रीं राजा
मम, सतत नाचते ॥ १ ॥

विसरूं कशि मी तव ध्यानाला
अंतरिच्या या थैमानाला
विझवूं कशी रे हृद्भावाला
असह्यता जाचतें ॥ २ ॥

चिमणी पोरें चिवचिव करिती
बाबा ! बाबा !! साद घालिती
दिसे न कधीं परि सुख शांती
दुःख सदा जाळतें ॥ ३ ॥

—रा. ना. पांडे

## अनंताचा-झिम्मा

झिम्मा खेळूं ये ग, झिम्मा खेळूं ये ॥ धृ ॥
अनंताच्या विश्वांगणी उषा निशा साऱ्या जणी
रवि शशी तारा कोण? राधा गोपी गोप गण
हरपून सारें भान झिम्मा खेळत.......झिम्मा खेळूं...
इंद्रधनुष्य-कमान सजविली किती छान
नीलांबरीं मेघमाला देव देखती सोहळा
सोमपानीं मस्त गहिऱ्या झिम्मा खेळत.......झिम्मा खेळूं...
विद्युल्लता ध्वजधारी कडाडली काय भेरी
विजयाची गर्जे वाणी तेज ओके दहा दिशांनी
झिम्मा खेळत झिम्मा खेळूं ये.......झिम्मा खेळूं...
लाविली झुंबरें नक्षत्र शोभा आगळी सर्वत्र
उडु गणांच्या दिपोज्योती ओवाळीत कुणा आरती
मांत्रिक झिम्मा खेळत झिम्मा खेळूं ये.......झिम्मा खेळूं...
सारिपटावर हीं रत्नें कुबेर उधळी माणिक मोत्यें
खेळत राहो गूढ गुंजते झिमतालावर द्यूत संपला......झिम्मा खेळूं...
विश्वीं चाले उत्सव मोठा मानव राही पहा करंटा
आसक्तीच्या मायिक पाशीं डुंबुनि घेई मिठी उराशीं
निद्रा घोरत अविरत निश्चल झिम्माविन कपाळ करंटा
झिम्मा खेळूं ये ग झिम्मा खेळूं ये.......झिम्मा खेळूं...
भू-स्वर्गाचा जुळवित हात नाच नाचतो केका गात
घटा-सुरेचे भेद मिटावे देव नभीचे मानव व्हावे
झिम्मा खेळत हांसत हर्षत झिम्मा खेळूं ये.......झिम्मा खेळूं...
ऊठ, ऊठ मानवा याज्ञिका ना दवडी समय तूं फुका
नाच नाच रे झिमतालावर कवीहो गातो त्याच सुरावर
झिम तालावर झिम्मा खेळत हांसत गर्जत.......झिम्मा खेळूं...

—मनोहर गो. सिरास

## अजून आहे

अजून आहे हातीं परडी
नयनीं अश्रु वाट कोरडी
वेचिन फूलें घालिन तूला
ऊन अश्रूंची मी वरमाला
अजून आहे माझ्या नयनीं
मूर्ति तुझी ती लाजिरवाणी
पाहीन तुझें मोहक स्वप्न
जन्म लाभला जरि का अन्य

—जे. बी. देशमुख

## अर्थ

नको गड्या पाहूं असा
मजकडे पुन्हा पुन्हा
नजरेचा खेळ तुझा
घायाळच करी मना
नेत्र तुझे भीडतांच
होते लज्जेने मी चूर
वाटे पळूनच जावें
तुझ्या पासूनच दूर

झुके नकळत मान
तुला पाहतांना राया
नाहीं आज होत धीर
तुझ्याकडे रे यावया
नको सांगू कांहीहि
काय सांगायचे आहे ?
तुझ्या भावनांचा अर्थ
मला समजला आहे

—सुधाकर लोखंडे

## स्मृति गंध

अनंत उपमा अन् उत्प्रेक्षा करिती तुझी प्रतिक्षा
चिरविरहाचें धुकें विरावें हीच मनीं आकांक्षा
प्रभात वारा उडवित राही पदर तुझा चंदेरी
सावरतांना केश-अंजली तव धांदल उडते भारी
ठाशीव बांधा, रेखीव दांत, चकाकणारीं कर्णफुलें
चाल तुझी गलबत नाचें शिडांत वारा भरलेलें
मधुर तुझा आवाज परिसती चांदीचेहि पैंजण
तुझें बोलणें सुस्वर संगीत, कोकिळकंठी गायन
तुझ्या गोरट्या हनूवटीवर मारू हसतो तीळ निळा
चंद्राची मोहकता त्यावर पळतो मृग तिरळा
कधी हासुनी फुले मुखावर प्राजक्ताचा बहर
तव गालावर खळ्या उमटती, बकुळीचा अहेर
जुन्या तुझ्या मधु आठवणींना देण्या नवा उजाळा
बाळगतो हृन्मंदिरांत मी, तुझ्या स्मृतीचा सुगंधि वाळा
अनंत उपमा अन् उत्प्रेक्षा करिती तुझी प्रतिक्षा
प्रणयपूर्तिने सखे जिवलगे, उतरव तूं विरहाचा नक्षा

—जे. बी. देशमुख

## पूर

आला नदीला तो पूर ॥ धृ ॥

उफाळत्या पाण्या जोर
जाई खाली येई वर
दिसेनाची कुठे तीर ॥ १ ॥

अत्याचारी नृप जसा
छळे प्रजा, पूर तसा
करे अती बलात्कार ॥ २ ॥

गर्वाचें तें घर खाली
तशी नदी ओसरली
राहे पाणी गुढघाभर ॥ ३ ॥

पुरावानी श्रीमंतीचें
अप्सरेच्या वानी नाचे
यौवनाचा जयीं जोर ॥ ४ ॥

धुंदी माजी सान थोर
कळे नच खोटं खरं
वैभव हें क्षणभर ॥ ५ ॥

—ल. गो. गोहने

## दुःखाची तुज कां भिति ?

दुःखाची तुज कां भिति,
सख्या रे दुःखाची तुज कां भिति ॥ धृ ॥
बघ पहाड आडवे येती
नदी चाले फोडुनी पुढती
बघ काव्य नभि ते किती
चमकती तारे हंसुनि अती ॥ १ ॥

किती काटयांच्यावर ती हंसे
छान गुलाब तो फूलतसे
खरे भट्टींत तापुन दिसे
सोने रे परीक्षा हो ती ॥ २ ॥

ऐरणीं वरी ठेविला
मारती घण त्याजला
दणदणा आपटुनी टोला
खरे हिरे कधीं न फुटती ॥ ३ ॥

संकटा सवें खेळुनी
प्राणाची पैज लावुनी
कर सफल जीव झुंझुनी
अितिहास हेंच ओरडती ॥ ४ ॥

—पांडुरंग बोंदरे

## वियोग

कळला मला तुझा गे होणें वियोग आहे
तुटणार आज संग बहूकाल लाभला हें
गाठी जरी विधीने बांधून ठेवल्या हे
हृदयांत मेळ बसले तुटणें ग शक्य कां हे ?
झरतील नीर दगडे पाहून शोक माझा
रडतील जीव प्राणी शोधून दुःख काजा
विरहाग्निच्या शलाका हृदयांस देई चटके
नाजून काळजाचे तोडून घेई लचके
विरहाचियाचं वज्रें प्रेमांस इजा केली
जी रेखलींत स्वप्नें तीं चूर्ण चूर्ण झालीं
लिहलींत प्रेमकाव्यें सुहास्यशा मनानी
लिहील पण स्मृति त्या अश्रूंचिया जलांनी
चिंतू नको मला तूं राहीन एकला मी
सौख्यीं, तुझ्या सखे गे आनंदपूर्ण मानीं
नीरोप तुला देता हृदयांत पीळ पडते
बोलूं कसा सखे मी ? कंठात शब्द अडते

—काव्यभृंग

# कशी आमुची माया सुटली

कशी आमुची माया सुटली ? काहो वनमाळी ?
कशांस राहूं ? कोठे जावूं ? सांगा या वेळी
जीवन नौका अपुल्या स्वाधिन, लज्जा धन माझे
कैसे लपवूं वस्त्राविण ते ? जगांत मज ओझें
प्रेम हि केलें, सर्व विसरले, तुझ्यांत हो लीन
पेटविली स्मृति-ज्योती तव रे हृदया जाळून
आत्म्यामध्यें मिसळुनि आत्मा होऊन तद्रुप
संसाराची घडी बसविली प्रणय रम्यतेंत
पहात होते रम्य स्वप्न मी अपुल्या सहवासी
हाय ! परि ते भंगुनि गेंले झाले वनवासी
भ्रमर तुझें मन मोहित झाले दुसऱ्या पुष्पाला
पराग नेऊनि तृप्ति करोनी कुस्करिलें मजला
कवण चुकीचे प्रायश्चित्त हें देवविले राया ?
करोनी माझ्या मधुस्वप्नाचा नाश तुवां वाया
काय घालुं मी असेंच जीवन आशा मम मरती ?
काय चालु मी अरण्य सगळे शून्य मनें पुढती ?

—हरिहर वा. देशमुख

# दूर सारूनी जा !

जा जा जा तूं जा
प्रेम ठेवुनी जा ।। धृ ।।

आठव अमुचा नित्य असूं दे
स्मृती मनाशीं गोड हसूं दे
गात्रांना ह्या पुलकित बनुं दे
उमलत हृदयीं जा ।। १ ।।

जा म्हणता गे हृदय पोळतें
या आत्म्याचें भान हरपतें
कर्तव्याचें चित्र नाचतें
मनः चक्षुशीं, जा ।। २ ।।

कर्तव्याच्या या वेदीवर
मूर्त कल्पना होति अनावर
त्या व्यामोहे खूप मनावर
दूर सारूनी जा ।। ३ ।।

---रा. ना. पांडे

## ध्येयमूर्ति

या हिंदभूस मी माझ्या आनंदपूर्ण झोपाळी
बसवीन ध्येय हें माझें सुखसमृद्धीच्या भाळी
घनघोर अशा कार्यांची बहुथोर खंडशीलाही
ही ओबड धोबड आहे, आकार तिला नच कांही

निजविश्वासाची छन्नी
धैर्याची घन हातोडी
स्वदान वेळीं अर्पोनी

या ध्येयाची ही मूर्ति करणार साच मी पूर्ती
रे शिल्पकार मी आहे या ध्येयाच्या मूर्तीचा
'ध्येयवादी' माझें नांव, संकेत असे विजयांचा
अवलंब असे मी केला काटेरी ध्येयपथाचा
ध्येयमूर्ति-गांवी जाण्या आनंद जिथे स्वर्गाचा
हा मंत्र असे रे माझ्या एका ध्येयशील वेड्याचा
हे मुर्ते ! या देहाच्या तुज पायघड्या घालीन
सूर्याचा मुकुट करोनी शीर्षावर तव ठेवीन
पदत्राण तया चंद्राचे पायांत तुझ्या घालीन
गगनरूपी नीलवर्णी शालू तुज परिधानीन

तारक सुमनें खुडुन
चरणावर तव घालीन
स्वयं धन्य धन्य मानीन

स्फूर्ति दे मजला ध्येया, यश मंदिर तुज दावाया

—काव्यभृंग

## तूंचि माझा राम

तूंचि माझा राम, रति अभिराम
तुझ्याविण मला सुख ना आराम ॥ धृ ॥

हिंदी महासागरात लंका एक बेट
लंकेचिया बेटांत सोनियाची पेठ
सोनियाच्या पेठेंत रावणाची ऐंट
रावणाच्या ऐटींत गर्वाचं धाम ॥ १ ॥

सोन्याच्या लंकेचं महाजंबु-द्वीप
महाजंबु-द्वीपांत रावण जरी भूप
रावण जरी भूप, राया स्मरे तुझं रूप
स्मरे तुझं रूप हृदी हंसे आत्माराम ॥ २ ॥

सोन्याच्या लंकेत जंबु-फळबाग
जंबु-फळ-बागेंत ओके मी आग
ओके मी आग परी गुंफे अनुराग
गुंफे अनुरागांत गोड रामनाम ॥ ३ ॥

लंकेच्या वाटेन वीर हनुमंत
वीर हनुमंताला वानराची साथ
वानराच्या साथीन बांधुनिया सेत
बांधलेल्या सेतून यावे सुतराम ॥ ४ ॥

दूता करीं धाडी सीता मीलन-रूपी पत्र
मीलन-रूपी पत्रांत रेखी माझं चित्र
रेखी माझं चित्र हृदीं धरी मी पवित्र
धरी माझा पावित्र्या निःशंक भोलाराम ॥ ५ ॥

--गु. सू. मेहरे

## आम्ही

वसुंधरेवर भास्कर आला
नवतीचीं उधळाया किरणें
रातराणिचा खेळ संपला
विसरा अंधारातिल गाणें

सुस्वर संगित पशुपक्षाचें
कळतें त्यांना निसर्ग कोडें,
आम्हि मानवी जीव परंतु
स्वार्थापायीं झालो वेडे

—वामनाग्रज

## किती तरी चाळी

जीवनाचें स्मशान......अभावाने पेटें
भुकेची आग.........हाडाला चाटे
वितळून हाडें...........नीर येई डोळीं
रोज धुतल्या जाती......किती तरी चाळी

—गोविंद नन्नोरे

## प्रेमाविण मही शुष्क दिसे !

रात्र सारिली चातकापरी
महि तुडवुन आलों सर्व जरी

नद सागर लक्षिले परोपरी
कण एक मिळेना प्रेम तरी.

नभी मेघ दाटले लोभाचे
बघ पूर लोटले स्वार्थाचे

प्रेम-बिंदुपरि एक नसे
प्रेमाविण महि शुष्क दिसे.

मंदिर मस्जिद शोधतसे
गिरजाघर गुरुद्वार तसे

वर वर भपका बहुत दिसे
परि प्रेम-उमाळा आंत नसे.

—ना. गो. खडसे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 31180 वी न गी
ओ. दि.

## येई म्हणसी ये खुशाल !

येई म्हणसी, ये खुशाल !
हृदय-वीणा छेडुनिया, नादि ते झंकारुनी
अंतरीचें दुःख माझें सांगते हाकारुनी ॥
भवामाजी दोन नौका चालल्या या सागरीं
मत्तवारु या मनाचा सूख शोधी अंबरीं
विद्ध झाली शक्ति त्याची पुनश्च आले जीवनी
हृदय-वीणा छेडुनीया नादि ते झंकारुनी ॥ १ ॥

ध्येय-सिद्धीचा किनारा यत्नवादें तो समोर
दीप आशेचा प्रकाशे तोंच दिसला गांव तीर
दिवस गेले, रात्री आल्या, गांव ज्योति पेटली
गगन-थाळीं सांज वेळीं तारकांनी उजळली
देउळाच्या नाद घंटा शांत झाले ऐकुनी
हृदय-वीणा छेडुनीया नादि ते झंकारुनी ॥ २ ॥

हृदय चंद्रा दुःखमेघें अंकीं अपुल्या झाकिलें
मनःशांती स्पर्शताचि मेघ अश्रु वर्षले
भारवाहू हृदय-देहा सौख्य सारें लाभलें
जा निराशे ! जा इथोनि स्थान नाही राहिलें
येई म्हणसी ये खुशाल ! सांगते आर्जवुनी
हृदय-वीणा छेडुनिया नादि ते झंकारुनी ॥ ३ ॥

—सौ. कमलाबाई सोहनी

## हर्षुन मनीचें तेज फाकलें

वर्षाऋतुचा खेळ मजेचा
आनंदाचा हर्षभराने मन वेडावें
टप टप थेंब, सर सर शिरवे
नद्या ओढे भरूनी धावे.

सृष्टि सतीचें सुरम्य मंगल
सरिता सखिचें नृत्य उच्छृंखल
भास्कर-मधुची फिरवें कोमल
वृक्ष-डोलती, हास्य स्तिमित दल.

वर्दी उडाली, उठलें श्यामल
धावूं लागलें अनंत मंडल
इकडून तिकडे फिरके बिजली
विहरूनि रविचीं नयनें दिपलीं.

रवि लाजरा नयन झांकलें
घन-श्यामासि आड घेतलें
अवनीनें तें कधिच हेरलें
हर्षुन मनीचें तेज फाकलें.

—ना. गो. खडसे

## कल्पना

कल्पनेच्या मारू भराऱ्या
स्वैर जाऊं या गगनांत
आकांक्षांच्या हिंदोळ्यावर
झोके घेऊं डौलांत.

चला सख्यांनो सर्व मिळोनी
ताऱ्यासंगे गाऊं गाणीं
तिथे न आपणा पाही कोणी
खेळ खेळू या मौजेत.

अज्ञानाचा किती पसारा
अवनीवर ह्या दिसतो सारा
असह्य होई येथिल वारा
दूर जाऊं या वेगांत.

कल्पनेच्या साम्राज्यांत
राज्य करुं या स्वच्छंदात
इथे न कोणी देई त्रास
विश्वाचे मग भान हरुं.

—सौ. निला देशपांडे

## ज्ञान माझे अधुरे

शेतकऱ्याची भाषा मुका बैल जाणे
पक्षी वेचे सूक्ष्म मातीतले दाणे
दुसऱ्यावर श्वान जावुनिया भुंके
मालकाचे बोल अंधारांत ओळखे
ऐकलेल्या शब्दाचे पोपट करे स्मरण
गिधाडाला कळे ढोराचें मरण
'पेर्ते व्हा' ची घोषणा पाखरू करे
ज्ञान माझे अधुरे सांगे सारें सारें

—वसंत देशमुख

## त्या शब्दातून आता

आकांक्षेचें सरण
धाय ! धाय !! जळलें
हाय ! हाय !! उरले
नुसते शब्द
त्या शब्दांतून आता
विश्वाचें दुःख
झिरपतें आहे
जखमेंतून जसे
घळघळ रक्त

—गोविंद नम्नोरे

## अखंड किर्ती !

वरें केलें इंद्रायणी
गाथा तुक्याची तारली

लेणें अभंग लेवूनि
माय मराठी नांदली

गाथा तुक्याची गातांना
नांव तुझेहि येईल

तुझ्या कीर्तीचीही धार
आता अखंड वाहील

—हरिश मानधना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ........

## वानगी

धाडली मी 'वानगी'
वाणीच्या हुरड्याची
गरीबाची ही भेट
साध्या भोळ्या भावाची

तुरीच्या शेंगा अन्
गव्हाच्या ह्या उंबया
आहेत चवी शेंगा--
चवळीच्या कोंवळ्या

अंबाडीची वाळली--
भाजी हिरवी छान
गोड करुनि घ्या हो
दुखवूं नका मन

खेडूत आहों आम्ही
मऊ आमचं मन
प्रेमबंध राखतो
'वानगी' ही देवून

गोड करुन घ्या ही
गरीबाची 'वानगी'
तुम्हा आम्हा फुलवो
यशानंदाची सुगी

--'कुसुम'

* * * *

# ओ ळ ख

**श्री. रा. ना. पांडे**—यशस्वी मुख्याध्यापक म्हणून यांचा लौकिक आहे. टी. टी. सी. व सा. स्नातक, 'मिलन' त्रैमासिकाचे संपादक. परमहंस परशराम महाराज चरित्र प्रकाशित केलें. 'अजून सुधारायचं आम्हांला', 'चिलेंपिलें' व 'निबंध निर्झर' प्रकाशनाची वाटचाल करीत आहे.

**श्री. नारायण गोविंदराव खडसे**—रूरल इन्स्टिटयूट, अमरावती येथे मॅट्रिकनंतर चार वर्षाचा अभ्यासक्रम संपवून एन. डी. आर. एस. एस. डिप्लोमा प्राप्त केला. महाविद्यालयीन जीवनांत अग्रेसर राहून त्यांनी बरीच बक्षीसें पटकाविलीं. सा. विशारद ( प्रयाग ) व सा. स्नातक या परीक्षा उत्तीर्ण आहेत. शालेय जीवनापासूनच त्यांना कविता करण्याचा व वाचनाचा नाद आहे. आपल्या सुशील व गुणग्राही स्वभावाने त्यांनी आपली मित्रसंपदा फारच वाढविली. सध्या ते नागपूरला शिक्षक आहेत.

**श्री. विष्णु बाबूराव तानवडे**—हिंदुधर्माविषयीचा यांचा स्वाभिमान अत्यंत जागृत आहे. संयुक्त महाराष्ट्राचे प्रभावी पुरस्कर्ते. त्यांच्या विचारांचा त्यांच्या कवितेवर प्रभाव दिसून येतो.

**श्री. चिंतामण गोविंद कुळकर्णी**—जन्म १७–५–१९१९ 'तलवार', 'प्रजासत्ता', 'कल्पफुलें' व 'मंथन' मधून कविता प्रकाशित. कविता करण्याचा नाद आहे.

**श्रीकांत गोवंडे**—'आनंदीसुत' या नांवाने प्रसिद्ध असलेले म्हैसूरचे राजकवि श्री प्र. बा. गोवंडे यांचे सुपुत्र. बी. ए. चा अभ्यासक्रम करीत आहेत. काव्य व लघुकथांचें विपुल लेखन. लवकरच काव्य संग्रह प्रकाशित करण्याचा यांचा संकल्प आहे.

**जीवनकुमार स्वरूपचंद राठी**––'रा. स्नातक', 'कोविद', डीप. टी. 'चांगले गुरुजी' म्हणून अल्पावधीतच प्रिय झाले. 'मेळा' प्रतिनिधिक काव्यसंग्रहांत 'मातृभूमि', 'नवा विदर्भ' आदि दिवाळी अंकांतून कविता प्रसिद्ध झाल्यात.

**गुलाब सूर्यभानजी मेहरे**––माजी सैनिक. बालपणापासूनच कविता करण्याचा त्यांचा छंद उत्तरोत्तर वाढतच आहे. पोष्ट खात्यांतील नोकरी सांभाळून कविता करताहेत.

**सुधाकर बलवंत लोखंडे**––३०–७–१९३५. इंटर आर्टसपर्यंत शिक्षण. शिक्षकाचा व्यवसाय करितात. 'रजनी' व 'बालकथा' प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

**सौ. कमलाबाई सोहनी**––'कोविद', 'प्रविण' व 'शिक्षक सनद' आदि परीक्षा उत्तीर्ण. यांनी 'सांगते ऐका' हें पुस्तक प्रकाशित केलें आहे. 'आतां पटलें' या श्रुतिकेला शासनाकडून ३०० रुपयाचा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे. नभोवाणीवर व गणेशोत्सवांत कार्यक्रम होत असतात. यांचा मनाला रिझविणारा 'काव्यकमल' काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे.

**वसंत भाऊराव खोंडे**––काव्याचा छंद आहे. यांच्या बऱ्याचशा कविता नियतकालिकांतून व 'गुरुदेव' मधून प्रकाशित झाल्यात.

**शंकर काळे**––जन्म २२–१०–१९३४. मॅट्रिकनंतर शिक्षकाचा व्यवसाय सांभाळून बी. ए. ची पदवी घेतली. 'चाहूल' व 'वंदना' प्रा. का. संग्रहांत कविता समाविष्ट. त्यांच्या दोन मराठी गीतांच्या ध्वनिमुद्रिका झाल्या आहेत. अमृत, संजय, विणा, नवल, महाराष्ट्र आदि मासिकांतून कविता प्रकाशित झाल्यात.नियमितपणें साहित्यसाधना करणारामध्ये ते एक आहेत.

**विनयकुमार केशवराव विचूरकर**––'काव्यभृंग' या टोपण नांवाखाली कविता करतात. यांचा 'काव्य ज्योती' काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे. बालवयांतच त्यांना कविता करण्याचा नाद जडला तो अजूनपर्यंत कायम आहे.

**रूपराव राजारामजी पटारे**––जन्म १९३०. 'वामनाग्रज' या नांवावर काव्य लिहितात. यांचा 'संजविका' या नांवाचा भजन संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे.

**महादेव नारायणराव श्रीखंडे**—विद्यार्थीदशेंतच ते कवित्व करीताहेत. सध्या ते मॅट्रिकचा अभ्यास करीत असून 'रा. भा. परिचय' परीक्षा उत्तीर्ण आहेत.

**जनार्दन भिमराव देशमुख**—मॅट्रीक पास असून शेतीचा व्यवसाय सांभाळतात. वयाच्या सतराव्या वर्षी यांची 'श्रद्धांजली' कविता प्रकाशित झाली. 'गुरूदेव', मुलांचे मासिक, सोवियत देश, अमृत, रसरंग आदि मासिकांतून यांचे साहित्य प्रकाशित झालें. यांचं अप्रकाशित साहित्यहि लवकरच प्रकाशित होत आहे.

**हरीहर वामनराव देशमूख**—बी. ए. पर्यंत शिक्षण, साहित्य विशारद (प्रयाग), शिक्षकाचा व्यवसाय सांभाळून सामाजिक कार्यांत आत्मीयतेने अग्रेसर राहतात. यांना नाटकांत कामं करण्याची हौस आहे. छंदबद्ध कविता करण्याचा नाद आहे. निस्वार्थी समाजसेवक म्हणून यांनी अल्पावधींतच ख्याती प्राप्त करून घेतली आहे.

**म. ल. वराडपांडे**—बी. ए., नागपूर प्रदेश, भारत सेवक समाजाचे रीजनल पब्लिसिटी अधिकारी आहेत. यांच्या कविता अनेक मासिकांतून प्रकाशित होतात. आपल्या गोड स्वभावामुळें तें सर्वांनाच प्रिय आहेत.

**मनोहर गोंविदराव सिरास**—बी. ए. एल्. एल्. बी., शिक्षकाचा व्यवसाय, कविता करण्याची आवड आहे.

**कृष्ण माधव देशमुख**—जन्म १९३८. मॅट्रीक, कोविद. शिक्षकाचा व्यवसाय सांभाळून साहित्यसेवा साधतात.

**केशवकुमार काळे**—मुख्याध्यापक आहेत. साहित्याची आवड असून नियमितपणें लिहिणें हा त्यांचा छंद आहे.

**रा. गो. उकेकर**—हे 'द्वारकानंद' या नांवाने लिहितात. रा. भा. कोविद, सा. स्नातक व राष्ट्रभाषेचे प्रमाणित प्रचारक आहेत. १ आक्टोबर ६० पासून व्यवहारांत येणाऱ्या "मॅट्रीक पद्धति व्यवहार मार्गदर्शक" हें पुस्तक प्रकाशित होत असून इतरहि कांहीं पुस्तकें प्रकाशित करण्याचा त्यांचा मानस आहे.

**श्री. वि. तु. खोंगल**––‘विठ्ठल’ नांव धारण करून कविता लिहितात. मॅट्रिक नंतर शिक्षकाचा व्यवसाय पत्करला. खाजगीरित्या अभ्यास करीत करीत सध्या ते एम. ए. चा अभ्यास करीत आहेत. सा. पारंगत (नागपूर) व सा. विशारद (प्रयाग) या परीक्षा उत्तीर्ण आहेत. कुशल अध्यापक, कष्टाळू समाज-सेवक म्हणून ते सुपरिचित आहेत. आपल्या मनमिळावू व निर्लोभ स्वभाव वृत्तीमुळें त्यांना अनेक मान्यवर मित्र लाभले आहेत. त्यांची ‘तीन पुस्तकें’ लवकरच प्रकाशित होत आहेत. प्रतिकुल परिस्थितींतून ते पुढे येत आहेत. हिंदीचे प्रमाणित प्रचारक आहेत.

**केशव बोबडे**––शिक्षकाचा व्यवसाय. रा. भा. कोविद, सा. विशारद आदि परीक्षा उत्तीर्ण आहेत. चित्रकलेची मनापासून आवड आहे. ‘पालखीत आले पाय’, ‘नवा शोध’, ‘देव करतो बऱ्यासाठीं’ या नाटकांचे लेखन केले आहे. या सर्व नाटकांचे प्रयोग झाले आहेत.

**शेषराव पाटील**––शिक्षण इंटर पर्यंत. एस. टी. सी. व रा. भा. कोविद परीक्षा उत्तीर्ण. धार्मिक प्रवृत्तीकडे ओढा जास्त आहे. ते सर्वोदय विचारसरणीचे कुशल अध्यापक आहेत. त्यांच्या कविता ‘गुरुदेव’ मधून प्रकाशित होतात. लवकरच त्यांचा कविता व लेखांचा संग्रह प्रकाशित व्हायचा आहे. ‘मेळा’ प्रा. का. संग्रहांत त्यांची कविता आहे.

**काशीनाथ सुत**––पूर्ण नांव भा. का. डफळापूरकर आहे. इंटर आर्टस् व कोविद परीक्षा उत्तीर्ण आहेत. काव्याची आवड असून कविताचे लेखन करतात. वाचनाचा व्यासंग दांडगा आहे.

**ल. गो. गोहने**––डी. एम. पी. (नागपूर), लेप्रॉलॉजिस्ट, डॉक्टरी व्यवसायांत डोळ्यांत भरण्याजोगी प्रगति केली. कविता लेखनाची आवड आहे.

**उ. आ. झटाले**––‘आमचे गुरुजी’ म्हणून सर्वांनाच प्रिय झालेले श्री झटाले हे बी. ए. बी. टी. आहेत. इंग्रजी एम. ए. चा अभ्यास करीत आहेत. आपलीं मतें निर्भिडपणें ऐकविण्यांत यांचा हातखंडा आहे. उत्साही व तळमळीचे कार्यकर्ते व कुशल अध्यापक म्हणून प्रसिद्ध आहेत. इंग्रजी लेखांचा संग्रह प्रकाशित होऊ घातला आहे.

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
... ३८८९० दि: ...३१-८४
... १९८९ ... २८-

**पांडुरंग महादेवराव बोंदरे**—वैद्यराज, सेवा पारंगत आदि परीक्षा उत्तीर्ण. खेड्यांत राहून वैद्यकीय व्यवसायाद्वारें समाजसेवा करीत आहेत. काव्याची आवड आहे.

**पद्माकर शंकरभाई जोशी**—मातृभाषा गुजराती असून देखील मराठीत हौसेने लेखन करतात. हिंदी, इंग्रजी व गुजराती भाषेवर प्रभुत्व आहे. इंटर आर्टस् (बनारस) परीक्षा उत्तीर्ण असून शेतीचा व्यवसाय सांभाळतात.

**रांम शंकर पुसदकर**—इंटर आर्टस् पर्यंत शिक्षण. काव्य, कथा व बाल साहित्याची निर्मिती १९५७ पासून करीत आहे. 'गुरुदेव', 'नवा विदर्भ' व 'तरुण भारत' मधून लिखाण प्रकाशित.

**सौ. निला देशपांडे**—शिक्षिकेचा व्यवसाय सांभाळून खाजगीरित्या इंटर झाल्या. यांच्या कांही बालकविता 'बालक' मधून प्रकाशित झाल्या. कविता व बाल साहित्याचे लेखन चालू आहे.

**गोविंद पर्वतराव नन्नोरे**—जन्म १९१९, शिक्षण इंटर आर्टस् पर्यंत 'साहित्य रत्न' (प्रयाग) परीक्षा उत्तीर्ण. आगळ्याच वैशिष्टयाने नटलेला यांचा 'तळमळ' काव्यसंग्रह मागील वर्षीच प्रकाशित झाला. प्रस्तुत प्रातिनिधिक काव्य संग्रहाचे संपादक आहेत. 'कर्मयोगी' लो. टिळकांच्या जीवनावरील प्रदीर्घ काव्य व 'जिव्हाळा' कविता-संग्रह लवकरच प्रकाशित होत आहे. ते पुरोगामी विचाराचे तडफदार वक्ते आहेत. यांना लहानपणापासूनच कवित्व करण्याचा नाद आहे.

**जयकुमार भीमराव इंगळे**—हे 'जय इंगळे' या नांवानेच परिचित आहेत. 'मेळा', 'वर्षा' व प्रस्तुत काव्य संग्रहाचे संपादक आहे. 'मिरास' कादंबरी प्रकाशनाचे वाटेवर आहे.

**रंगनाथ शंकर बंदसोडे**—जन्म १९-३-१९३१. तार खात्यांतील नोकरी सांभाळून नियमितपणे यांचे कविता लेखन चालू आहे. 'नीरांजन', कविता', 'मेळा', 'शालेय राष्ट्रीय गीतें' आदि प्रातिनिधिक काव्यसंग्रहांत कविता समाविष्ट झाल्या आहेत.

**कृष्णा गापू पाटील**—जन्म १२-४-१९३२. बालपणापासूनच काव्याची आवड. नव्यानेच प्रसिद्धीस येत आहेत.

**वसंत देशमुख**––इंटर कॉमर्सपर्यंत शिक्षण. रा. भा. परिचय उत्तीर्ण. बालपणापासून वाचनाचा नाद असून अलीकडे कवितांचे लेखन करीत आहे. ‘मेळा’ संग्रहांत कविता प्रसिद्ध झाली आहे. यांचा लवकरच ‘विनोदी लेख संग्रह’ प्रकाशित होत आहे.

**बाबा मोहोड**––साहित्य प्राज्ञ परीक्षा उत्तीर्ण. यांचा ‘पायवाट’ काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. ‘मानवतेचं महातिर्थ’ गुरुकुंज आश्रम विषयीची माहिती दर्शविणारी पुस्तिका लवकरच प्रकाशित होत आहे.

**उ. रा. गिरी**––हे विदर्भांतील एक प्रसिद्ध कवि आहेत. त्यांच्या कविता किर्लोस्कर मधून नेहमींच प्रकाशित होतात. यांचा ‘धुन’ कविता संग्रह युवक प्रकाशन, अमरावती तर्फे लवकरच प्रकाशित होत आहे.

**हरीश मानधना**––महाराष्ट्रभर गाजलेल्या ‘मेळा’ संग्रहाचे संपादक. युवक साहित्य सभा, अमरावती–नागपूरचे एक आधारस्तंभ. ‘गुरुदेव’ दिपलक्ष्मी, सोवियत देश, लोकसत्ता, मधून विविध साहित्य प्रकाशित. नागपूर आकाशवाणीवर काव्याचे कार्यक्रम होतात.

**कृष्णकुमार माधवराव भाजीखाये ‘कुसुम’**–– जन्म २४–९–१९३४. प्री. आर्टस् उत्तीर्ण. ‘मालन’ अप्रकाशित कादंबरी. ‘आशाराणी’ लघुकथा संग्रह प्रकाशित करण्याचा मानस. चित्रकला व संगीताची आवड.

# गोविंद नुन्नोरे

## यांच्या

# " त ळ म ळ "

## काव्य-संग्रहावरील प्रथितयश साहित्यिकांचे आणि नियतकालिकांचे अभिप्राय

### तळमळीचें स्वागत फक्त तळमळीनेच

'तळमळ' नांवाच्या या काव्यांत सर्वदूर तळमळच प्रत्ययास येते. साध्याहि विषयांत मोठा आशय पाहणाऱ्या आणि प्रत्ययास आणून देणाऱ्या या कविचें हे पहिलें वहिलें काव्यपुष्प विदर्भ सरस्वतीच्या शिरकमली खुलून आणि शोभून दिसेल या पेक्षां अधिक काय म्हणावे ?

—'स्वदेश' साप्ताहिक, यवतमाळ.

२०–१–६०

★

### काव्यगुण भरपूर

विनम्रता आणि प्रामाणिकपणा यांचा आविष्कार या कवितांतून दिसत आहे. कविजवळ काव्यगुण भरपूर आहेत. सात आठ कविता काव्य व कला या संबंधीच असून, प्रस्तुत कविची प्रकृति व्यक्त करतात. तेव्हां या 'तळमळीला' तुफान स्वरूप प्राप्त होईल, अशी आशा करूं या.

—'सकाळ' मुंबई–पुणें.

६–३–६०

★

## सुंदर व मधुर

आपली कविता स्वभावता सुंदर व मधूर आहे. आपली प्रतिभा अशीच उज्वल गीतें प्रसवो अशी सदिच्छा आहे.

—भवानी शंकर पंडित, नागपूर
१७–३–६०

★

## अंतःकरणाचें काव्य—खरें खरें काव्य

आपल्या काव्याचा पहिला विशेष म्हणजे प्रांजळपणा. कवीचे अंतः-करण सर्वत्र व्यक्त झालें आहे. कांहीं कांहीं प्रेमगीतांमधून कमालीची कोवळीक प्रत्ययाला येते. आजच्या रूपवादी काव्यनिर्मितीच्या काळांत आपल्या काव्यसंग्रहांतील कवितेचे विशेष स्वागत करावेसें वाटतें. कारण तिचें काव्यत्व अचाट कल्पना, चतुर रचना, किंवा बाह्य लालित्य यावर आधारलेले नसून तें अंतःकरणाचें काव्य आहे—खरें खरें काव्य आहे.

—शरच्चंद्र मुक्तिबोध
नागपूर, २९–३–६०

★

## प्रेमळ, प्रांजळ, प्रासादिक

खरोखर आपली तळमळ ही जिवाची मळमळ शमविणारी, त्यास रमविणारी, शोषकांना नमविणारी ( प्रतिकार करून ) अशा स्वरूपाची प्रेमळ, प्रांजळ व प्रासादिक आहे. तिच्यांत सहजता व शुद्धता दोन्हीहि गुण आढळून येतात व म्हणून ती नेहमीं गुणगुणावी वाटते.

आपल्या तळमळीबद्दल कितीहि लिहिलें तरी थोडेच आहे व ती थोडीहि अंगी बाणली तरी पुष्कळ आहे.

—कृ. ना. देशपांडे, लोणार
६–४–६०

★

## मराठी भाषेवरील सुंदर कविता

अत्यंत विपन्नावस्थेंत दिवस काढून धडपडत वर आलेल्या एका शिक्षक कवीचा हा काव्यसंग्रह वाचल्यावर 'तळमळ' नांव सार्थ करणारा आहे, याची खात्री पटते. मराठी भाषेवरील कविता सुंदर आहे. त्या कवितेंतील ओळी आपल्यालाहि कवीप्रमाणें गुणगुणाव्याशा वाटतील.

**––प्रा. भाऊ मांडवकर, अमरावती**
२०–४–६०

★

## साध्या पायवाटेप्रमाणें

श्री नन्नोरे यांची ही कविता साध्या पायवाटेप्रमाणें असून ती येत्याजात्या पांथस्थाचें सेवेच्या रूपाने स्वागत करण्यांत समर्थ आहे. त्यांच्या 'तळमळी'तून स्फुरलेल्या ३७ हि कविता त्यांच्या या वैशिष्टयाची ओळख करून देतात.

गुरुकुंज, मोझरी
एप्रिल १९६०
**––'श्री गुरुदेव', [वर्षारंभ अंक]**

★

## जिव्हाळा

साहित्य-रत्न गोविंद नन्नोरे यांच्या कवितांचा हा संग्रह जिव्हाळयानें भरलेला आहे. . . . . रसिक वाचकांच्या ते अधिक आदराला पात्र होतील.

**—'महाराष्ट्र', नागपूर**
१७–४–६०

★

## उत्कट भावना, साधा अविष्कार

आपल्या कवितेंतील भावना उत्कट असून तिचा आविष्कारहि साधा पण समर्पक आहे. काव्याच्या उत्कर्षास हेंच आवश्यक आहे. या क्षेत्रांत आपणांला सुयश इच्छितो.

शिवाजी रस्ता, नाशिक,
२२–४–६०
**––वि. वा. शिरवाडकर, कविवर्य कुसुमाग्रज**

★

## साहित्यांतील मक्तेदारीवर डंख

साहित्य क्षेत्रांतील मक्तेदारीवर केलेला डंख कविच्या हृदयाचा आणि उदयोन्मुख कविच्या स्थितीचा नग्न परिचय करून देणारा आहे.

—'शिवशक्ति', अकोला
१६–५–६०

★

## खरी कळकळ, निष्कपटपणा, अनुप्रासयुक्तता

आपल्या लेखनांत खरी कळकळ आहे, ह्यांत संशय नाहीं. त्याच प्रमाणे निष्कपटपणाहि आहे. भाषेंत साधेपणा तर आहेच, पण अनुप्रास-युक्तताहि आहे.

'मराठी भाषा' ह्या कवितेंतील आपलें मातृभाषेवरील उत्कट प्रेम कौतुकास्पद आहे.

एकंदरींत आपली काव्यशक्ति उपजत व खरी आहे, ह्यांत मुळींच संशय नाहीं.

—बळवंत गणेश खापर्डे (कविभूषण प्रा० अण्णासाहेब खापर्डे) अमरावती, १–६–६०

★

## सुखविणारा, रमविणारा, जिव्हाळा

प्रस्तावना लेखक औरंगाबाद येथील ज्ञानविज्ञान कुलाचे प्रिंसिपाल–डॉ. मा. गो. देशमुख यांनी "त्यांच्या या सदतीस कवितापैकीं एकूणएक कवितेंत मनाला क्षणभर सुखविणारा व रमविणारा जिव्हाळा आहे"—असा अभिप्राय व्यक्त केला आहे, तो सार्थ वाटतो.

.............. विदर्भांतील कवि परंपरेंत तो मानाचे स्थान मिळवू शकेल, असा विश्वास वाटतो.

—'तरुण भारत', नागपूर
५–६–६०

★

## वैदर्भीय प्रतिभेचें वैशिष्टय

महाराष्ट्र सारस्वतांतील वैदर्भीय रीतीचे स्थान जसें अनन्य साधारण आहे, तसेंच विदर्भांत प्रसवलेली ही कविता वैदर्भीय प्रतिभेचे वैशिष्टय प्रतीत करून देणारी, स्फूर्तिपद आणि सामर्थ्यशालिनी आहे, असे मनमोकळेपणाने म्हणावेसें वाटते.

**—ब. ना. एकबोटे, यवतमाळ**
२०–७–६०

★

## 'तळमळ' नांव सार्थ

कोमल मनाच्या कवीने आपली भावतळमळ विविध वृत्तांत आणि सरळ भाषेंत व्यक्त केल्यामुळें संग्रहाचें 'तळमळ' हें नांव सार्थ वाटते.

शब्दसौष्ठवाच्या मागे लागून काव्य दुर्बोध व नकली करण्यापेक्षा अंतरीची तळमळ भोळया-भाळया भाषेंतच व्यक्त करण्याकडे कवीचा कल आहे.

**—'जीवन विकास' (मासिक) नागपूर**
जुलै, ६०

★

## SIMPLE BUT SINCERE

I am much impressed by the high quality of your poetical talent. Every word is pregnant with meaning and embodies the aesthetic—interpretation of life. It is simple but sincere.

**—M. L. Varadpande,**
Regional Publicity,
Officer, Nagpur Pradesh.
B. S. S., Arvi, D/ 20–6–60.

★

## GEMS HIDDEN IN DUST

I think I am one of those who have the honour to appreciate your poetic genious from your early days of school carear. There are many who took enthusiasm and passions from you. I am one of them. With this context my joy knows no bounds to see that your efforts are fulfilled.

The literary world new that gems are hidden in dust and are neglected. I have gone through your book over night and devoured the contents, which are mixed with pathos and satire over the orthodox views.

—**S. J. Kulkarni**, Wardha.
19–6–60.

REFBK-0011246
REFBK-0011246

कशीहि फिरवा । कुठेही वळवा ।
दिसेल गोडवा । नवा-नवा ॥

—अशीं ही कवींची 'तळमळ' तुमच्या हृदयांत तळमळ निर्माण करील—महाराष्ट्रांतील अनेक नियतकालिकांनी वाखाणलेला व विद्वान् साहित्यिकांनी प्रशंसिलेला—

तळमळ
(काव्यसंग्रह)

कवि : गोविंद नन्नोरे
प्रस्तावना : प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख
पुरस्कार : प्रा. मधुकर केचे
मूल्य : १ रुपया पंचवीस नवे पैसे
शशी प्रकाशन, वार्ड नं. १, धामणगांव रेल्वे (विदर्भ)

— व्यवहारोपयोगी पुस्तक —

१ आक्टोंबर १९६० पासून सक्तीने व्यवहारांत येत असलेल्या 'मेट्रीक' वजनमापाच्या सरलतेसाठी दुकानें, कारखानें, पोष्ट ऑफीस, औद्योगिक व शैक्षणिक संस्थादि, सर्वांनाच अत्यंत उपयुक्त असलेलें

'मेट्रीक पद्धति व्यवहार मार्गदर्शक'
आजच मागवा

लेखक : रा. गो. उकेकर
प्रस्तावना : प्रॉ. डॉ. चान्सरकर, नागपूर
मूल्य : केवळ एक रुपया : व्ही. पी. ने २ रु. ११ नवे पैसे.
मिळण्याचा पत्ता : सौ. लीला उकेकर
द्वारकानंद प्रकाशन, हरम ता. अचलपूर जि. अमरावती (महाराष्ट्र)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 36690 वि: काव्य
क्रमांक 1262 नों. दि. 15-9-55

युवक प्रकाशन अमरावती

# मेका

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

मराठी मनांत स्वतःचे प्रतिबिंब उमटविणारा, "रेखा भागवत स्त्री की पुरुष ?" "कवीने टीकाकाराची भूमिका स्वीकारावी कीं, नाही ?" ह्या व अशा अनेक प्रश्नांमुळे वादाचा विषय झालेला, मराठीतील एकमेव आणि अन्तर्बाह्य भरभक्कम प्रातिनिधिक काव्यसंग्रह

सोवतच–**प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध** यांची मननीय प्रस्तावना.

: संपादक :

**गिरीश राठी** **हरीश मानधना**

**जय इंगळे**

■

मूल्य : केवळ दीड रुपया

प्राप्तिस्थान : नवयुग बुकडेपो, अमरावती.

## — आगामी —

'**वर्षा**' मेळाची श्रेष्ठ परंपरा कायम ठेवणारा आगामी प्रातिनिधिक काव्यसंग्रह '**दुगाण्या**' बेफाम विनोदी कथा आणि लेखसंग्रह '**रुबया**' मराठी साहित्यांत प्रथमच प्रकाशित होत असलेला सुरेश श्रीधरांचा **रुबया** संग्रह.